सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, २१ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १५० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शाळकरी मुलींवर अत्याचार प्रकरणी नफीस चिश्तीसह ६ जणांना जन्मठेप

## अजमेर येथील 'ब्लॅकमेल-ॲण्ड रेप' प्रकरण



अजमेर : राजस्थानच्या अजमेरमधील सुमारे ३२ वर्षांपूर्वी घडलेल्या ब्लॅकमेल आणि बलात्कार प्रकरणातील (-क्षाशी १९९२ डशु डलरपवरश्र) उर्वरित ६ आरोपींना जन्मठेप आणि ५ लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

या प्रकरणातील नफीस चिश्ती, नसीम उर्फ टारझन, सलीम चिश्ती, इक्बाल भाटी, सोहेल गनी आणि सय्यद जमीन हुसेन हे सहा आरोपी आज कोर्टामध्ये हजर होते. १९९२ पासूनच्या या प्रकरणामध्ये १०० हून अधिक मुलींना अश्लील फोटो टाकून ब्लॅकमेल करण्यात आले होते. तसेच या मुलींवर गँग़रेप देखील करण्यात आले होते. या प्रकरणात एकूण १८ आरोपी होते. त्यापैकी काही आरोपींना १९९८ मध्ये शिक्षा झाली होती. तर उर्वरित ६ आरोपींना आज, मंगळवारी शिक्षा ठोठावण्यात आली.

कोर्टाने नफीस चिश्ती, नसीम उर्फ टार्झन, सलीम चिश्ती, इक्बाल भाटी, सोहेल गनी आणि सय्यद जमीर हुसैन यांना दोषी ठरवले आहे आणि त्यांना जन्मठेप आणि प्रत्येकी ५ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.

राजस्थानच्या अजमेर येथील गँगने १९९२ साली शाळा-महाविद्यालयात शिकणाऱ्या २५० मुलींची नग्न छायाचित्रे मिळवली होती. त्यानंतर सुमारे १०० हून अधिक विद्यार्थीनींना ब्लॅकमेल करून सामूहिक बलात्कार करण्यात आले. ही टोळी विद्यार्थिनींना फार्म हाऊसवर बोलावून अत्याचार करायची. यामध्ये ११ ते २० वयोगटातील विद्यार्थिनी होत्या.

पोलिसांनी या प्रकरणी कैलाश सोनी, हरीश तोलानी, फारुख चिश्ती, इशरत अली, मोइजुल्ला उर्फ पुतन अलाहाबादी, परवेझ अन्सारी, नसीम उर्फ टारझन, पुरुषोत्तम उर्फ बबली, महेश लुधानी, अन्वर चिश्ती, शमसू उर्फ मॅराडोना आणि चिश्ती यांना अटक केली. ३० नोव्हेंबर १९९२ रोजी अजमेर न्यायालयात पहिले आरोपपत्र सादर करण्यात आले. पहिले आरोपपत्र ८ आरोपींविरुद्ध आणि त्यानंतर ४ स्वतंत्र आरोपपत्र ४ आरोपींविरुद्ध होते. यानंतरही पोलिसांनी अन्य ६ आरोपींविरुद्ध आणखी ४ आरोपपत्रे सादर केली. इथेच पोलिसांची सर्वात मोठी चूक झाली, त्यामुळे प्रकरण लांबत गेले.

## लेटरल एंन्ट्रीच्या माध्यमातून पदभरतीला स्थगिती; युपीएससीला जाहिरात मागे घेण्याचे केंद्राचे आदेश

नवी दिल्ली : लेटरल एंट्रीच्या माध्यमातून पदांची भरती करण्याला विरोधी पक्षांनी तीव्र विरोध केल्यानंतर केंद्र सरकारने लेटरल एंट्रीला स्थगिती देण्याची घोषणा केली आहे. यासंदर्भात केंद्र सरकारकडून यूपीएससीला पत्र लिहून या संदर्भातील सूचना देण्यात आल्या आहेत.

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी यूपीएसचीचे चेअरमन यांना यासंदर्भातील पत्र पाठवण्यात आले आहे. ज्यामध्ये त्यांनी यूपीए सरकारच्या काळात अशा नियुक्तांसाठी घेण्यात आलेल्या पुढाकाराचा उल्लेख करण्यात आला आहे. या पत्रामध्ये म्हटलंय की, २००५ मध्ये वीरप्पा मोईली यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्यांदा केंद्र सरकारने लेटरल एंट्रीची शिफारस केली होती. दरम्यान, हल्लीच यूपीएससीकडून लेटरल एंट्रीसाठीच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र ही भरती प्रक्रिया आणि त्यामधील आरक्षणावरून विरोधी पक्षांकडून केंद्र सरकारवर सातत्याने टीका करण्यात येत होती.

## कोलकाता येथील डॉक्टरवर बलात्कार आणि हत्या प्रकरणी प. बंगाल सरकारला सर्वोच्च न्यायालयानेही खडसावले

नवी दिल्ली : कोलकात्याच्या आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये बलात्कार प्रकरणावर सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू झाली आहे. याप्रकरणी आज, मंगळवारी झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने देशातील डॉक्टरांच्या स्थितीवर चिंता व्यक्त केली. याशिवाय सुरक्षेसाठी राष्ट्रीय स्तरावर टास्क फोर्स तयार करण्याची सूचनाही दिली आहे.

याशिवाय सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगाल सरकारवरही प्रश्न उपस्थित केले आहेत. डॉक्टरांच्या सुरक्षेशी संबंधित हा मोठा मुद्दा असल्याने आम्ही स्वत:हून दखल घेतली, असे न्यायालयाने म्हटले आहे. ९ ऑगस्ट रोजी सेमिनार हॉलमध्ये प्रशिक्षणार्थी डॉक्टरचा मृतदेह आढळून आला होता. या प्रकरणाची सुनावणी करणारे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड म्हणाले की, 'सकाळी गुन्हा उघडकीस आल्यानंतर मुख्याध्यापकांनी ही आत्महत्या भासवण्याचा प्रयत्न केला आणि पीडितेच्या पालकांनाही मृतदेह देखील पाहू दिला नाही. तसेच घटना उजेडात आल्यानंतर रात्री उशिरापर्यंत एफआयआर नोंदवण्यात आला नव्हता. याप्रकरणी एफआयआर नोंदवण्यास झालेला उशीर आणि घटनास्थळी नासधूस केल्याबद्दल न्यायालयाने राज्य सरकारला खडसावले आहे.

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड म्हणाले की, 'आरजी कार हॉस्पिटलमध्ये ३६ तासांपासून शिफ्टमध्ये असलेल्या डॉक्टरवर बलात्कार झाला. मृतांचे फोटो आणि व्हिडिओ शेअर केले गेले. त्यानंतर १३ ऑगस्ट रोजी उच्च न्यायालयाने हे प्रकरण सीबीआयकडे वर्ग केले. तर १५ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२.३० वाजता एका जमावाने आपत्कालीन वॉर्ड आणि इतर ठिकाणी घुसून तोडफोड केली. यानंतर आयएमएने देशभरातील आपत्कालीन सेवा १४ तासांसाठी बंद ठेवण्याचे आवाहन केले.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी राज्य सरकारने यंत्रणा तैनात करणे अपेक्षित आहे. राज्य सरकार हे का करू शकले नाही, हे आम्हाला समजत नसल्याचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड म्हणाले.

'डॉक्टर आणि महिला डॉक्टरांची सुरक्षा हा राष्ट्रहिताचा मुद्दा आहे आणि समानतेचे तत्त्वही तेच सांगते. देश काही पावले उचलण्यासाठी दुसऱ्या बलात्काराची वाट पाहू शकत नाही. आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्यासाठी राज्यात कायदे आहेत, परंतु ते प्रणालीगत समस्यांना सामोरे जात नसल्याचे न्यायालय म्हणाले.

दरम्यान मेडीकल कॉलेजमधील प्राचार्यांच्या भूमिकेची चौकशी सुरू असताना त्यांना लगेचच दुसऱ्या कॉलेजचे प्राचार्य कसे बनवण्यात आले..? असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला. सीबीआयला याबाबत शनिवारी स्टेटस रिपोर्ट दाखल करावा लागेल आणि तो संवेदनशील पातळीवर असल्याने आम्हालाही स्टेटसची माहिती द्यावी लागेल, असे न्यायालयाने निर्देश दिले आहेत.

## जम्मू-काश्मीरमध्ये सकाळी सकाळीच भूकंपाचे धक्के

श्रीनगर: धरतीवरील स्वर्ग म्हटल्या जाणाऱ्या जम्मू-काश्मीरमध्ये सकाळी सकाळीच भूकंपाचे धक्के जाणवले.जम्मू-काश्मीरमध्ये मंगळवारी सकाळी भूकंपाचे धक्के बसले. भूकंप इतका जोरदार होतो की लोकांची झोप यामुळे उडाली आणि ते घाबरून उठले. ते सर्व घराच्या बाहेर निघताना दिसले. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीने ही माहिती दिली. जम्मू-काश्मीरमध्ये काही वेळाच्या अंतराने दोन वेळा भूकंप आला. पहिला भूकंप हा दुसऱ्या भूकंपाच्या तुलनेत अधिक जोरदार होता. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ४.९ इतकी होती. जम्मू-काश्मीरच्या बारामुल्ला, पूंछ आणि श्रीनगरसह काश्मीर खोऱ्यात भूकंपाचे धक्के जाणवले. तर दुसरीकडे पाकिस्तानातही भूकंपाचे धक्के जाणल. दरम्यान, आतापर्यंत भूकंपाच्या घटनेत कोणतीही जिवितहानी झाल्याचे वृत्त नाही.

## विमान प्रवास महागला! आता एकदिशा विमान प्रवासासाठी द्यावे लागणार अधिकचे पैंसे

नवी दिल्ली : एकीकडे माणसाला दैनंदिन जीवनात गरजेपयोगी लागणाऱ्या वस्तूंचे दर वाढत चालले असताना आता प्रवासदेखील महाग होत चालल्याचे चित्र दिसून येत आहे. सध्या सणासुदीचा काळ सुरू झाला असून याचा चांगलाच फायदा विमान कंपन्यांनी घेतला आहे. गणेशोत्सव, ओनम, दिवाळी अशा सणांच्या कालावधीत प्रवासासाठी आत्तापासून विमानाच्या तिकीटांचे आरक्षण सुरू झाले आहे. त्यातच आता विमानप्रवासात शुल्कवाढ झाल्याचेही दिसून येत आहे. त्यामुळे ऐन सणांच्या काळात नागरिकांच्या खिशाला चांगलीच कात्री बसत आहे.

प्रमुख देशांतर्गत मार्गावरील वन-वे तिकीट दर १० ते १५ टक्क्यांनी वाढले आहेत. तर केरळ शहरांमध्ये काही फ्लाइटचे भाडे २० ते २५ टक्के वाढवण्यात आले आहेत. इक्सिगो या ट्रॅव्हल पोर्टलने दिलेल्या माहितीनुसार, ३० ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत दिल्ली-चेन्नई मार्गावरील थेट फ्लाइटसाठी इकॉनॉमी क्लासचे सरासरी वन-वे भाडे २५ टक्क्यांनी वाढून ७ हजार ६१८ रुपये झाले आहे. तर मुंबई-हैदराबाद मार्गावरील तिकीट दर २१ टक्क्यांनी वाढून ५ हजार १६२ रुपये झाले आहेत. दिल्ली-गोवा आणि दिल्ली- अहमदाबाद मार्गावरील भाडे १९ टक्क्यांनी वाढून अनुक्रमे ५ हजार ९९९ रुपये आणि ४ हजार ९३० रुपये झाले आहेत.

## बदलापूर अत्याचार प्रकरणातील आरोपींवर फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवणार!

मुंबई : बदलापूर मध्ये एका शाळेत मुलींवर झालेल्या अत्याचाराची अतिशय गंभीर दखल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली असून अशा घटना घडल्यास प्रसंगी संस्थाचालकांवर देखील कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला आहे. आरोपीला कडक शासन करण्यात येईल, यासाठी जलदगती न्यायालयात तातडीने खटला चालविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी पोलीस आयुक्तांशी देखील चर्चा केली. सखी सावित्री समित्या शाळांमध्ये स्थापन झाल्या आहेत किंवा नाही ते तपासण्याचे निर्देशही त्यांनी दिले. बदलापूर पूर्वेतील एका नामांकित शाळेत दोन मुलींवर झालेल्या अत्याचाराची माहिती मिळताच मुख्यमंत्र्यांनी तातडीने शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याशी चर्चा केली आणि अशा घटना होऊ नयेत म्हणून कायमस्वरूपी ठोस उपाय योजण्यास सांगितले.

## केरळमध्ये होणार संघाची तीन दिवसीय बैठक



नवी दिल्ली, २० ऑगस्ट : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय समन्वय बैठक ३१ ऑगस्ट ते २ सप्टेंबर दरम्यान केरळच्या पलक्कड येथे होणार आहे. संघाची ही ३ दिवसीय बैठक वर्षातून एकदा घेतली जाते. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये पुण्यात या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, संघप्रणित विविध संघटनांमध्ये काम करणाऱ्या संघटनेचे प्रमुख अधिकारी अखिल भारतीय समन्वय बैठकीत सहभागी होतात. या सर्व संस्था सामाजिक जीवनातील विविध क्षेत्रात सकारात्मक कार्यात लोकशाही मार्गाने समाजपरिवर्तनाच्या कार्यात सक्रिय राहतात. बैठकीत विविध संस्थांचे अधिकारी त्यांच्या कामाची माहिती आणि अनुभव सांगतात. राष्ट्रीय हिताच्या विविध विषयांच्या संदर्भात सध्याची परिस्थिती, अलीकडील महत्त्वाच्या घटना आणि सामाजिक बदलाच्या इतर आयामांवरील योजनांवर या बैठकीत चर्चा होणार आहे. विविध विषयांवर परस्पर सहकार्य आणि समन्वय वाढवण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवरही सर्व संघटना चर्चा करतील.

सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, सरकार्यवाह दत्तात्रेय होसाबळे, सर्व सहा सह-सरकार्यवाह आणि इतर प्रमुख अधिकारी या बैठकीत सहभागी होणार आहेत. या बैठकीत राष्ट्र सेविका समिती, वनवासी कल्याण आश्रम, विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय जनता पार्टी, भारतीय किसान संघ, विद्या भारती, भारतीय मजदूर संघ यासह विविध ३२ संघ प्रेरित संघटनांचे राष्ट्रीय अध्यक्ष, संघटना मंत्री आणि प्रमुख अधिकारी सहभागी होतील.

## राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांची गतिमानतेने व प्रभावीपणे अंमलबजावणी करा -डॉ.प्रविण गेडाम

अहमदनगर दि. १९ ऑगस्ट : राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी योजनांचा लाभ सर्वसामान्यांना सुलभतेने घेता यावा यादृष्टीने नियोजन करत या महत्वाकांक्षी योजना जिल्ह्यात प्रभावीपणे व गतिमानतेने राबविण्याचे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात शासनाच्या विविध महत्वाकांक्षी योजनांच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी विभागीय आयुक्त श्री गेडाम बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी, शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांच्यासह योजनांचे समन्वय अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. प्रविण गेडाम म्हणाले की, राज्य शासनाच्या फ्लॅगशिप योजनांपैकी मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजना असुन या योजनेंतर्गत जिल्ह्यात ७ लाखापेक्षा अधिक लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.

या योजनांचा लाभ महिला लाभार्थ्यांना सुलभतेने घेता यावा यादृष्टीने योजना राबवावी. योजना राबविण्यात काही तांत्रिक अडचणी येत असतील तर त्यांची प्राधान्याने सोडवणूक करावी. ज्या महिला लाभार्त्यांचे बँक खाते आधार क्रमांकसोबत अद्यापही जोडण्यात आलेले नाहीत ते तातडीने लिंक करून घेण्यात घेण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.मुख्यमंत्री-युवा कार्य प्रशिक्षण योजनेद्वारे युवकांना खासगी तसेच शासकीय, निमशासकीय आस्थापनेवर प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे.

जिल्ह्यातील अधिक पदे असलेल्या पोलीस, आरोग्य, महानगरपालिका, विद्युत विभाग यासारख्या आस्थापणा बरोबरच सर्व ग्रामपंचायती, जिल्ह्यातील मोठ्या शाळांमधून या युवकांना प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी. जिल्ह्यातील सहकार, सेवाक्षेत्रातूनही या युवकांना प्रशिक्षणाची संधी देण्याचे निर्देश श्री गेडाम यांनी यावेळी दिले.

### बिडकीन डीएमआयसी मध्ये नवीन प्रकल्प येण्यास सुरुवात झाली असून गावामध्ये शांततेचे वातावरण असू द्या

## हिंदू मुस्लिम एकता शांतता समितीची बैठक संपन्न



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि.२० ऑगस्ट पैठण तालुक्यातील बिडकीन ग्रामपंचायत मंगल कार्यालय येथे आज दि.२० मंगळवार रोजी सकाळी दहा वाजता बिडकीन ग्रामपंचायत सरपंच अशोक धर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली बिडकीन सर्कल मधील ग्रामपंचायत सरपंच व सदस्य तसेच परिसरातील नागरिकांची व हिंदू -मुस्लिम एकता शांतता कमिटीची बैठकीचे आयोजन करण्यात आली होती. यावेळी बिडकीन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांची उपस्थिती होती याप्रसंगी सरपंच अशोक धर्मे यांनी मार्गदर्शन प्रसंगी सांगितले की आपल्या बिडकीन मध्ये डीएमआयसी प्रकल्प सुरू होत आहे, आपल्या येथे बाहेर देशातून नवीन नवीन प्रकल्प येण्यास सुरुवात झाली आहे तरी बिडकीन व परिसरातील नागरिकांनी हिंदू -मुस्लिम एकतेचे प्रतीक असू द्या, तसेच कोणत्याही समाजाच्या तरुणांनी केव्हा नागरिकांना सोशेयल मीडिया वर चुकीची पोस्ट व्हायरल करु नये तरी सदरचा विडिओ कोणीही समाजमाध्यमांवर प्रसारित करु नये दोन समाजामध्ये भावना दुखवतील त्यामुळे दोन समाजा मध्ये तेडनिर्माण होईल असे कृत्य करू नये आपल्या इथे नवीन उद्योग येत असल्याने आपल्यासाठी मोठे सोने करण्याची संधी आली आहे, जाने करून नवीन येणारे प्रकल्प बाहेर राज्यात जातील असे कोणतेही कृत्य करू नये बिडकीन व परिसरामध्ये शांततेचे वातावरण असले पाहिजे असे सरपंच अशोक धर्मे यांनी सांगितले यावेळी आदी मान्यवरांनी शांतता विषयी मार्गदर्शन केले, याप्रसंगी सरपंच अशोक धर्मे, पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील, ग्रामसेवक अरुण गोर्डे, रमेश शिंदे, मधुकर सोकटकर,महेमुद शहा,सागर फरताळे,किरण गुजर,मोहन हिवाळे, नंदकुमार वैद्य, सुभाष डुबे,अमोल वंजारे, सर्कल मधील ग्रामपंचायत सरपंच सलीम पठाण, रामेश्वर जाधव, विष्णू भवर, चंद्रकांत चाबुकस्वार, सुरेश भिसे, गणेश इथापे, प्रभाकर निळ, अमोल कळसकर,सदस्य व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




MGM UNIVERSITY
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

Learn & Grow in
A Holistic Education System

ADMISSIONS OPEN 2024-25

Join our NEP-2020 aligned multidisciplinary Programs:

ENGINEERING & TECHNOLOGY (94206 06311/ 9371714253)
- B.Tech. (Integrated) (6 Yrs | After SSC): Robotics and AI, CSE (Data Science), CSE (IoT, Cyber Security Including Blockchain Technology), Civil (Computer Appl.), IT, Electrical, Adv. Mechatronics and Industrial Automation
- B.Tech. | M.Tech.: AI & Machine Learning, Data Science, Robotics, IoT, Geoinformatics, Cyber Security, Blockchain Technology, Computer Science, IT, Electronics & Computer Engg., Electrical & Computer Engg., Chemical, Civil (Computer Appl./Construction Tech.), Mech. & Mechatronics, VLSI Design, Environmental, Medical, Agriculture
- MCA: Master of Computer Application
- B. Arch. | M. Arch.: (General/Environmental)
- M.Tech. (Integrated) (5 Yrs | After HSC): CSE (AI & ML)

MANAGEMENT & COMMERCE (7666878389/ 8793047544)
- BBA | BBA: Business Analytics | Fintech | Aviation, Hospitality and Travel & Tourism Studies
- MBA: HR, Finance, Marketing, Production & Operation
- B.Sc. | M.Sc.: Hotel Operations & Catering Services, Culinary Arts
- B.Com. | M. Com.

BASIC & APPLIED SCIENCES (9371714256/ 9921154640)
- B.Sc. | M.Sc.: Computer Science, Information Technology, Animation, Robotics, Data Science, Integrated M. Sc.: Data Science (5 yrs.)
- BCA: Science, Digital Marketing
- B.Sc. | M.Sc.: Physics, Chemistry, Mathematics, Statistics, Forensic Science, Geology, Applied Geology, Home Science, Environmental Science, Biophysics, Industrial Mathematics, Biotechnology, Bioinformatics, Microbiology, Food Processing and Technology, Food Nutrition & Dietetics, Plant Breeding & MG, Industrial Microbiology, Food Technology, Microbiology/Virology
- B.Tech.: Biotechnology, Food Processing Technology, Biomedical
- B. Tech. | M. Tech.: Cosmetic Technology

PHARMACY (9371714265/ 8830428848)
- D. Pharm. | B. Pharm. | DSY B. Pharm.

SOCIAL SCIENCES & HUMANITIES (9371714257/ 9371714259)
- BA | MA: Mass Comm. & Journalism, International Journalism & Electronic Media, Broadcast Comm., Photography, International Photography, Economics, Psychology, Social Work, Political Science, Philosophy, History & Archaeology, English, Marathi, Hindi, Urdu, Sanskrit, BSW, MSW, Master of Public Health
- BA | MA: Filmmaking (Specialisations: Acting /Direction/ Editing/Cinematography/VFX/Sound & Music/Prod. Design)
- LLB | BBA LLB | LLM: Intellectual Property Rights & Property Law, Criminal and Security law, Constitutional and Administrative Law

PERFORMING ARTS (9372093189)
- BPA: Kathak, Odissi
- MA: Indology, Musicology
- MPA: Kathak, Odissi

DESIGN & FINE ARTS (7972988179)
- BVA | MVA: Contemporary Art
- BFA: Traditional Art | Applied Art
- B.Des. | M.Des.: Fashion Design, Textile Design, Interior Design, Industrial Design, Visual Communication, Jewellery Design | Product Design | Interaction and Interface Design | Furniture Design, Master of Fashion Management

INTERDISCIPLINARY STUDIES (9371714260/ 9371714262)
- BPA: Theatre | Music
- BPES (after 12th): Bachelor of Physical Education & Sports
- BA | MA: Education Buddhist Studies, Gandhian Studies, Women & Gender Studies, Physical Education, Yog Science, M. Library & Information Science

HIGHLIGHTS
- 340+NEP-2020 aligned Programs
- 'Learning by Doing' Approach
- Training & Placement Support
- World-class Infrastructure
- Advanced Research Facilities
- Attractive Scholarships
- 100k+ Alumni across the globe

Apply Now

www.mgmu.ac.in | 90676 12000 | 0240 6481111
MGM University, MGM Campus, N-6, Cidco, Chhatrapati Sambhajinagar – 431003, Maharashtra

# संत एकनाथ सचिन शूगरकडून जिल्ह्यात ऊसाला सर्वाधिक भाव



तभा वृत्तसेवा

पैठण दि २० :- पैठण तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी यांच्यासाठी वरदान ठरलेल्या श्री संत एकनाथ सचिन घायाळ शूगरकडून मागील हंगामासाठी जिल्ह्यात ऊसाला सर्वाधिक एकरकमी २७०५ रु.भाव देण्यात आल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन सीए सचिन घायाळ यांनी दिली.पुढील हंगामासाठी रोलर पूजन घायाळ यांच्या शुभहस्ते पार पडले यावेळी घायाळ बोलत होते.

शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी आम्ही सदैव कटिबद्ध असल्याचे यावेळी चेअरमन सीए सचिन घायाळ म्हणाले.३५ टन प्रती तास जास्त क्षमतेचे बॉयलर बसवण्यात आले असून स्प्रे पोन्ड मॉडीफिशियन,इंजेक्शन पंप,इले मोटर्स, नवीन रोटरी ज्यूस स्क्रीन सिस्टीम बसवण्यात आली आहे. काराखण्यात यंदा प्रतिदिन तीन हजार मेट्रिक टन ऊस गाळप क्षमता वाढवण्यात आली आहे. तसेच काराखण्यावर एक लाख लिटर प्रतिदिन इथेनॉल प्रकल्प लवकरच उभारण्यात येणार असल्याचेही घायाळ यावेळी म्हणाले. यंदाच्या हंगामासाठी ५०० टायर गाडी,२५० जुगाड आणि १०० वाहन टोळी सोबत करार केला असून लवकरच कारखान्याच्या सभासदांना सभासद कार्ड वाटप करण्यात येणार असल्याचे चेअरमन सीए सचिन घायाळ यांनी यावेळी स्पष्ट केले. या कार्यक्रमाप्रसंगी जेष्ठ संचालक विक्रमकाका घायाळ, आबासाहेब मोरे, कचरूतात्या बोबडे,एकनाथ नवले, भाऊसाहेब पिसे,दिगंबर गोर्डे, भारत घायाळ, गणेश घायाळ,दत्ता वाकडे, रवींद्र बोडखे, रवींद्र पाटील, कचरू झिने,शिवाजी जाधव, कैलास तुपकरी, कारखान्याचे जनरल मॅनेजर थोटे,चीफ इंजिनीयर पाटील ,चीफ केमिस्ट शेलार,कामगार सेनेचे अध्यक्ष काकासाहेब गोरे सह मोठ्या संख्येने ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे चेअरमन दिलीप बिर्ला यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२० ऑगस्ट

येथील कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे चेअरमन व

श्रीक्षेत्र श्री.भैरवनाथ संस्थान सोयगावचे अध्यक्ष तसेच शहरातील प्रतिष्ठित व्यापारी सतत समाजकार्यात अग्रेसर असणारे सोयगाव शहरातील प्रसिद्ध व्यापारी दिलीप बिर्ला यांच्या वाढदिवसानिमित्त कै.बाबुरावजी काळे पतसंस्था येथे शाल,श्रीफळ देऊन वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी पतसंस्थेचे संचालक दत्तात्रय देसाई,संचालक योगेश बोखारे,राजू एलीस,सुलेमान शेख सह सिताराम गोतमारे,कृष्णा शेवाळकर तसेच सामाजिक कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस शहर अध्यक्ष रवींद्र काळे, पत्रकार सुनिल काळे,कृष्णा पाटील,भागवत गव्हाडे,विजय गव्हाड,अजय नेरपगारे,दिनेश काळे,किशोर फुसे,सर्वांनी चेअरमन दिलीप बिर्ला यांचा सत्कार केला व वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व सोयगाव शहरातील जागृत देवस्थान भैरवनाथ महाराज मंदिर येथे दिलीप बिर्ला यांच्या हस्ते वाढदिवसानिमित्त एक वडाचे वृक्षरोपण करून एक झाड ही संकल्पना राबविण्यात आले.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

स्टोअर विभाग

नविदा सुचना क्रमांक (E-Tender) - 12/2024-2025

दि. 20/08/2024 ची सुचना

सन. 2024-2025 या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिका सर्व दवाखाने व रक्तपेढी करिता आवश्यक असलेली औषधे, रसायने, वैद्यकिय साहित्य व उपकरणांचे वार्षिक दर मंजूरीकामी ई-निविदा मागविणेसाठी https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा क्र. 2024-ANMC-1072863-1 या नंबरने जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी संबंधीतांनी नोंद घ्यावी.

सही/- उपायुक्त (सा.)

अहमदनगर महानगरपालिका

IDBI BANK

आयडीबीआय बँक लि.

क्षेत्रीय कार्यालय :- छत्रपती संभाजीनगर

रेणुका कॉम्प्लेक्स, घर क्र.५-६-१५, सि.स.नं.१७३२५,

दुसरा मजला, संत एकनाथ रंगमंदिरासमोर,

छत्रपती संभाजीनगर - ४३१००५

गंगाखेड,जि.परभणी, महाराष्ट्र येथे कार्यालयाच्या जागेची आवश्यकता आहे

बँक दीर्घकालीन भाडेतत्त्वावर **गंगाखेड, जि.परभणी** येथे अंदाजे १०००-१५०० वर्ग फीटची जागा घेण्यास इच्छुक आहे. तरी इच्छुक जागा मालकांनी १० दिवसांत (जाहिरात प्रसिद्ध झाल्याची तारीख सोडून) आयडीबीआय बँक लि., क्षेत्रीय कार्यालय,छत्रपती संभाजीनगर रेणुका कॉम्प्लेक्स, घर क्र.५-६-१५, सि.स.नं.१७३२५, दुसरा मजला, संत एकनाथ रंगमंदिरासमोर, छत्रपती संभाजीनगर - ४३१००५ येथे अर्ज करावे. स्वीकरण्याची अंतिम तारीख ३०/०८/२०२४ च्या सायं ६.००पर्यंत आलेले अर्ज फक्त स्वीकार्य राहतील. औपचारिकता आणि इतर माहिती आमच्या वेबसाईट www.idbibank.in Notice and Tenders येथून डाउनलोड करावी अथवा कुठल्याही आयडीबीआय बँक लि. च्या शाखेतुन प्राप्त करावी. बँक कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व अर्ज रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे

दि. २०/०८/२०२४ क्षेत्रिय प्रबंधक, छत्रपती संभाजीनगर

ARL

# खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी अमृत स्वायत्व संस्थेच्या विविध योजना



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २० ऑगस्ट पैठण तालुक्यातील बिडकीन येथील कोकणवेस मारुती मंदिर येथे खुल्या गटातील आर्थिक दुर्बल घटकांना मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अमृत या स्वायत्त संस्थेच्या वतीने गुरुवार दि १६ ऑगस्ट बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीची प्रस्तावना व सामूहिक गीत . विकास ढगे यांनी केले.संस्थेचे वक्ते अमृत विभागप्रमुख दिपक जोशी मुख्य मार्गदर्शक यांनी ब्राह्मण समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल ई डब्ल्यू एस जे तरुण व तरुणी आहेत यांना स्वयंरोजगार, कृषी उद्योग प्रशिक्षण,ड्रोण प्रशिक्षण, एमपीएससी,युपीएससी,आय आय आय टी,आय आय एम,एआयाय एम एस ,आयजीटिआर कोर्स,सी-डीएसी कोर्स, टंकलेखन, लघुलेखन, किशोरी विकास प्रकल्प, वैयक्तिक कर्ज व्याज, परशुराम गट व्याज परतावा योजना साठी अमृत संस्था मदतीसाठी तयार आहे, महाराष्ट्रातील अमृत संस्थेचे अनेक लाभार्थी मोठ्या स्वाभिमानाने व्यवसाय करीत आहे. ज्यांना परशुराम गटामध्ये बचत गटामार्फत व्यवसाय करावयाचा असेल यांनाही अमृत संस्था मदत करण्यास तयार आहे.उद्योग व्यवसाय करताना आपल्याला बँकेमार्फत कर्ज घ्यावे लागणार असून त्याच्या परतफेडसाठी जे व्याज होईल.त्या व्याजाची रक्कम १२ टक्के पर्यंत अमृत संस्था देणार आहे.या संस्थेच्या माध्यमातून ब्राह्मण समाजाने जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समन्वयक विकास ढगे, रामेश्वर साळुंखे यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास अमृत लक्षित गटातील गणमान्य व्यक्ती व लाभार्थी चांगल्या संख्येने उपस्थित होते.

# बाहुबलीच्या कालकेयची मराठीत एंट्री

छत्रपती संभाजीनगर - 'बाहुबली: द बिगिनिंग'मध्ये मुख्य भूमिकांसोबतच या सिनेमातील खलनायकाची म्हणजे कालकेयची भूमिकाही प्रचंड गाजली. त्याच्या अभिनयासाठी चाहत्यांनी त्याचे कौतुक देखील केले. त्याने साकारलेल्या 'कालकेय' च्या भूमिकेमुळे त्याला नवी ओळख मिळाली.

या चित्रपटानंतर दाक्षिणात्य अभिनेता प्रभाकर याने सिद्ध केलं की तो कोणत्याही व्यक्तिरेखा उत्तम प्रकारे साकारू शकतो. हाच 'कालकेय' म्हणजे अभिनेता प्रभाकर आता मराठीत दिसणार आहे. देव गिल प्रॉडक्शन अंतर्गत 'अहो विक्रमार्का' मराठी व्यतिरिक्त इतर ५ भाषांमध्ये मोठ्या पडद्यावर ३० ऑगस्टला प्रदर्शित होणार आहे.

'अहो विक्रमार्का' या ॲक्शनपटात अभिनेता प्रभाकर एका जबरदस्त भूमिकेत पाहायला मिळणार आहे. 'बेगाडा' ही तगडी खलनायिका भूमिका तो साकारताना पहायला मिळणार आहे. 'अहो विक्रमार्का' पहिला मराठी ब्लॉकबस्टर-पॅन इंडिया चित्रपट ३० ऑगस्टला ६ भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# लाडकी बहीण लव जेहादला बळी पडू नये म्हणून कठोर कायदा करा : कमलेश कटारीया



तभा वृत्तसेवा

पैठण दि २० :- देशात सुरू असलेल्या लव जेहादच्या माध्यमातून लाखो लाडक्या बहिणी यांच्या जाळ्यात फसत असून एकट्या महाराष्ट्रातून हजारो मुली, महिला गायब झाल्या आहेत.

यासाठी राज्य सरकारने लाडकी बहीण लव जेहादला बळी पडू नये म्हणून यासाठी कठोर कायदा करावा असे संकल्प हिंदू राष्ट्र अभियानचे कार्यवाह कमलेश कटारीया म्हणाले. बांग्लादेश हिंदू अत्याचाराच्या निषेधार्थ पैठणला सकल हिंदू समाज आयोजित भव्य जन आक्रोश मोर्च्याला ते संबोधित करत होते.या मोर्च्याच्या पार्श्वभूमीवर पैठणला कडकडीत बंद पाळण्यात आला.


छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करून या मोर्चाला सुरुवात करण्यात आली.पुढे महाराणा प्रताप स्मारक तसेच विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून खंडोबा महाराज चौकात या मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. यावेळी बांग्लादेशात हिंदू बांधवांवर होणारे अत्याचार तात्काळ थांबवावे, त्यांच्या सुरक्षिततेसाठी कठोर उपाय योजना राबवावी, गड किल्यांवर झालेले अतिक्रमण काढावे, गो हत्या बंदी कायदा अधिक कडक करावा, हिंदू रक्षणासाठी काम करणाऱ्याना सुरक्षा द्या,धर्मांतर बाबत कडक कारवाई करावी, हलाला अँक्ट,धुक जेहाद, बॉलिवूड जेहाद, हिंदू सणांच्या बाबतीत पेरत असलेल्या धुर्विकरणा बाबत कटारिया यांनी स्पष्टीकरण दिले. पैठणच्या सकल हिंदू समाज आयोजित या जन आक्रोश मोर्च्याला संत महंत,महिला व युवतींसह हजारोंच्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

# 'पाणी' १८ ऑक्टोबरला होणार प्रदर्शित

छत्रपती संभाजीनगर : राजश्री एंटरटेन्मेंट आणि पर्पल पेबल पिक्चर्स, कोठारे व्हिजन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'पाणी' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याच्या बातमीने मनोरंजन क्षेत्रात खळबळ उडाली होती. आता हा चित्रपट प्रदर्शनासाठी सज्ज झाला असून येत्या १८ ऑक्टोबर रोजी 'पाणी' चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने आदिनाथ कोठारे दिग्दर्शनात पदार्पण करत असून राजश्री एंटरटेन्मेंटसारखा मोठा बॅनर, इंटरनॅशनल आयकॉन अशी ख्याती असणारी प्रियांका चोप्रा आणि महाराष्ट्राची शान असलेले कोठारे व्हिजन प्रा. लि.असे तिन्ही मोठे निर्माते एकत्र येत आहेत. या तिघांच्या एकत्र येण्याने मराठी सिनेसृष्टीला एक सर्वोत्कृष्ट चित्रपट अनुभवायला मिळणार आहे.

नितीन दीक्षित आणि आदिनाथ कोठारे यांची कथा असणाऱ्या 'पाणी'मध्ये आदिनाथ कोठारे, रुचा वैद्य, सुबोध भावे, रजित कपूर, किशोर कदम, नितीन दीक्षित, सचिन गोस्वामी, मोहनाबाई, श्रीपाद जोशी, विकास पांडुरंग पाटील अशी तगडी स्टारकास्ट आहे. नेहा बडजात्या, दिवंगत रजत बडजात्या, प्रियांका चोप्रा जोनस, डॉ. मधू चोप्रा या चित्रपटाचे निर्माते आहेत. तर महेश कोठारे, सिद्धार्थ चोप्रा या चित्रपटाचे सहयोगी निर्माते आहेत.

# पावसात झाड उन्मळून पडले ! सुदैवाने जीवित हानी टळली



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२१ ऑगस्ट - शहरातुन जाणार कन्नड चाळीसगाव महामार्गा लगत असलेल्या विश्रामगृहा नजीक तीन पत्र्याच्या टपऱ्यावर झाड पडल्याची घटना घडली आहे यात सुदैवाने कोणती ही जीवितहानी झाली नाही

शनिमंदिर रोडवर विश्रामगृहाच्या भिंतीला लागून असलेल्या तीन पत्र्याच्या टपऱ्यावर दुपारी अडीच वाजेच्या सुमारास शहरात जोरदार पाऊस पडला याच वेळी झाड पडले यात मात्र मोठे नुकसान झाले असुन सुदैवाने कोणतीच जीवित हानी झाली नाही

नेहमी वर्दळीचा असणारा हा रस्ता असून पाऊस आल्याने रहदारी कमी होती यात इलियास शेख नूर पटेल यांचे दोन टपऱ्या होत्या तर असिफ पेंटर यांची एक टपरी होती,अचानकपणे झाड पडल्याने इलियास पटेल आत अडकले होते त्यांना मुक्का मार लागला आहे,तत्काळ नागरिकांनी त्यांना बाहेर काढले यात मात्र मोठे नुकसान झाले असून त्यांचा उदरनिर्वाह याच टपरीवर होता

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेव, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र. ३३९/२०२४

अर्जदार : १) फन्नास पि. विश्वनाथ लोहकरे वय ६५ वर्षे, धंदा शेती रा. माहुली ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) लंकाबाई भ्र. प्रकाश लोहकरे, वय ६७ वर्षे, धंदा घरकाम रा. माहुली ता. गंगापुर जि छत्रपती संभाजीनगर ३) भाऊसाहेब प्रकाश लोहकरे, वय ३५ वर्षे, धंदा शेती रा. माहुली ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त वि कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एम.व्ही. कसाने यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की गंगुबाई दादा ठोकळ ह्या मांजरी ता. - गंगापुर येथील रहिवाशी होत्या त्या दिनांक १२/११/१९९१ रोजी मयत झालेल्या आहे. मयत 'गंगुबाई दादा ठोकळ यांना एक मुलगी नामे अन्नपुर्णाबाई विश्वनाथ लोहकरे ही होती ती देखील

दिनांक ०४/०३/२००७ रोजी मौजे माहुली ता. गंगापुर येथे मयत झालेली आहे. मयत अन्नपुर्णाबाई विश्वनाथ लोहकरे यांना दोन मुले नामे अर्जदार क्र.१ फन्नस विश्वनाथ लोहकरे व प्रकाश विश्वनाथ लोहकरे असे होते यापैकी प्रकाश विश्वनाथ लोहकरे हे दिनांक १५/११/२०१५ रोजी मयत झाले असुन त्यांना अर्जदार क्र.२ ही पत्नी व अर्जदार क्र.३ हा मुलगा असे कायदेशीर वारसदार आहे. येणे प्रमाणे मयत गंगुबाई दादा ठोकळ यांना अर्जदार क्र.१ ते ३ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदारनसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २०/०८/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेव, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.३१५/२०२४

अर्जदार : १) नंदा भ्र. भाऊसाहेव गायके, वय ३६ वर्षे, धंदा गृहिणी रा. शहापुर वंजर ता, गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु. एन ३२, वृंदावन चौक, सिडको, नाशिक २) करण भाऊसाहेब गायके वय २३ वर्षे, धंदा शिक्षण, रा. शहापुर बंजर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु. एन ३२, वृंदावन चौक, सिडको, नाशिक ३) पुजा पि. भाऊसाहेब गायके वय २० वर्षे धंदा शिक्षण रा. शहापुर बंजर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु. एन ३२, वृंदावन चौक, सिडको, नाशिक ४) अंजली पि भाऊसाहेब गायके वय १९ वर्षे धंदा शिक्षण रा. शहापुर बंजर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु. एन ३२, वृंदावन चौक, सिडको, नाशिक

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त वि कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एम.व्ही. कसाने यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.३ व ४ ह्या आपसात नात्याने सख्या बहिणी असुन अर्जदार क्र.२ हा त्यांचा भाऊ आहे व अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे सासरे व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे आजोबा नामे शेकु आसाराम गायके हे मौजे शहापुर बंजर ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक १३/०४/२०१८ रोजी मौजे शहापुर बंजर ता. गंगापुर येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र.१ ची सासु, अर्जदार क्र.२ ते ४ यांची आजी (वडीलांची आई) नामे शांताबाई शेकु गायके ह्या देखील दिनांक १५/०४/२०२४ रोजी मयत झालेल्या आहे. मयत शेकु आसाराम गायके व मयत शांतावाई शेकु गायके यांना एक मुलगा नामे भाऊसाहेब शेकु गायके हा असुन तो दिनांक ०७/०१/२०१३ रोजी मौजे शहापुर वंजर ता. गंगापुर येथे मयत झालेला असुन मयत भाऊसाहेब शेकु गायके यांना अर्जदार क्र.१ ही पत्नी, अर्जदार क्र.२ हा मुलगा व अर्जदार क्र.३ व ४ ह्या मुली असे कायदेशीर वारसदार आहे. मयत शेकु आसाराम गायके यांना अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारस असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारसदारनसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २०/०८/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

संचिका क्रं.२०२४/३.वि.अ.वै. एम.ए.जी./ज. मृ. नोंद/सी.आर /२०२४

दिनांक :- १८/०७/२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री/श्रीमती किशोर बाबुराव भुजंग रा. वाळुज ता. गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय वाळुज ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार स्वतः नामे किशोर बाबुराव भुजंग यांचा जन्म दिनांक ०९/०३/१९७६ रोजी मौजे वाळुज गंगापूर येथे ता येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय वाळुज ता गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक १८/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर,

दिनांक :- १८/०७/२०२४.

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी- १/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-४३२ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २९/०७/२०२४

अर्जदार : अंकुश नंदलाल पवार रा. जैतखेडा तांडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय जैतखेडा तांडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड अनिल जी. राठोड यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांना त्यांचे मुलीचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचे मुलीचा जन्म दिनांक १०/०९/२०१५ रोजी जैतखेडा तांडा ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलीचा जन्म दिनांक १०/०९/२०१५ रोजी जैतखेडा तांडा ता. कन्नड कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलीचा जन्म दिनांक १०/०९/२०१५ रोजी जैतखेडा तांडा ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १८/०९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १०/०९/२०१५ रोजी जैतखेडा तांडा ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २९/०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी- १/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-४३३ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २९/०७/२०२४

अर्जदार ०:- अंकुश नंदलाल पवार रा. जैतखेडा तांडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय जैनखेडा तांडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड अनिल जी. राठोड यांच्या मार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांना त्यांचे मुलाचे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचे मुलाचा जन्म दिनांक १५/०७/२०१३ रोजी जैतखेडा तांडा ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक १५/०७/२०१३ रोजी जैतखेडा तांडा ता. कन्नड कामामाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलाचा जन्म दिनांक १५/०७/२०१३ रोजी जैतखेडा तांडा ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १८/०९/२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १५/०७/२०१३ रोजी जैतखेडा तांडा ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २९/०७/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे.व्ही.एन. काटकर मॅडम) क.स्तर यांचे कोर्टात**

दि.किरकोळ अर्ज क. १६४/२०२४

अर्जदार : १. मंगला भ्र. नारायण राजपुत वय-४२ धंदा-शेती २. राहुल पि. नारायणसिंग राजपुत वय-२५ धंदा-शेती ३. रणजित पि.नारायण राजपुत वय-२३ धंदा-शेती ४. रेणुका पि.नारायण राजपुत वय-२२ धंदा-शेती सर्व रा. मु.तलाववाडी पो. करंजखेडा (ज.) ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत...

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ४ यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की अर्जदार क. १ चे पती अर्जदार क. २ ते ४ यांचे वडील मयत नामे नारायण पि.फकिरचंद राजपुत यांचा मृत्यु दि. ०९/०५/२०१६ रोजी मौजे तलाववाडी ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून, मयतास केवळ अर्जदार क. १ ते ४ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत नारायण पि.फकिरचंद राजपुत यांचे नांवे आसलेल्या स्थावर व जंगम मिळकतीबाबत नमुद अर्जदार यांना वारस कारवाई करणेसाठी तसेच इतर शासकीय निमशासकीय तसेच निरनिराळ्या सरकारी योजनेंचा लाभ घेण्यासाठी व वारस कारवाई करण्यासाठी अर्जदार क. १ ते ४ हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क. १ ते ४ हे मयत नारायण पि.फकिरचंद राजपुत यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयताचे वारस अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय, तसेच स्थावर व जंगम मिळकतीचे रेकॉर्डला वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप ग्गाहय धरला जाणार नाही. करीता आज दि १४/०८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे

आदेशावरून

क. लिपीक सहाय्यक, अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड)

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना भुसंपादन कार्यालय शासकीय कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय सितानाईक तांडा, सर्व वित्तीय संस्थांना, बँकाना, सह. संस्था, पतसंस्थांना व धर्मु मलखना राठोड, हाकु मलखान राठोड, नवनाथ छगन राठोड, किशोर हाकु, मुलचंद धर्म राठोड, अनिल छगन रोठोड, विनोद छगन राठोडः सर्व रा. सितानाईक तांडा, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर, व त्यांचे वाली वारसांना तसेच लगतचे मालक व कब्जेदार यांना या जाहीर नोटीसीव्दारे आमचे अशिल पुनमचंद थावु राठोड रा. सितानाईक तांडा, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर, यांनी दिलेल्या माहीती व अधिकारा वरून या नोटीसीने कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णन -

अ) तुकडी जि. व जि. प. छ. संभाजीनगर, पो. तु. ता. प. स. कन्नड पैकी मौजे सितानाईक तांडा शिवारातील शेत मिळकत शेत गट नं. १ चे क्षेत्र ० हे १७ आर+ ० हे १८ आर+० हे १२ आर + ० हे १८ आर + ० हे १९ आर+ ० हे १२ आर+ ० हे १२ आर क्षेत्र यासी चतु:सिमा गाव नकाशा याप्रमाणे

२) वर नमुद मिळकत ही पुनमचंद थावु राठोड रा. सितानाईक तांडा, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर, यांचे अविभाज्य सामईक मालकी व वहीवाटीची आहे. सदर मिळकतीवर पुर्वीपासुन नोटीस देणार यांचे आजोबा यांचे नाव होते.

३) असे असतांना तुम्हीधर्मू मलखना राठोड, हाकु मलखान राठोड, नवनाथ छगन राठोड, किशोर हाकु, मुलचंद धर्म राठोड, अनिल छगन रोठोड, विनोद छगन राठोड सर्व रा. सितानाईक तांडा, ता. कन्नड, जि. छ. संभाजीनगर, संगनमत करून सदर मिळकत परस्पर विक्री करुन आर्थिक गैरफायदा करण्याच्या विचारात असुन आमचे अशिलांची फसवणुक व ठकवणुक केलेली आहे. तरी वर नमुद संपूर्ण मिळकतीत आमचे अशिलांचे मालकीची असून सदर मिळकतीचा परस्पर कोणताही सौदेपावतीचा, खरेदीचा, तारण, गहाण व ईतर कोणताही व्यवहार करून नये तसे केल्यास ते आमचे अशिलांवर बंधनकार राहणार नाही. तसेच त्याचे खर्चास व परिणामास ते स्वता जबाबदार राहतील. सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी सांगितलेल्या योग्य ती माहीती व कागदपत्रांवरून तसेच दिलेल्या अधिकारावरून योग्य ती फी घेउन आज रोजी अशिलांच्या खर्चाने प्रसिध्दीस दिली असे.

चाळीसगांव

दिनांक - २४/०६/२०२४

ॲड - अविनाश विश्वास जाधव

मो.नं. ९४०३२८०९०५

१०१, मोमाया कॉम्प्लेक्स, सिग्नल पॉईंट

चाळीसगांव, जि. जळगांव

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आ. राणाजगजितसिंह पाटील यांना राखी बांधण्यासाठी महिलांनी गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२० ऑगस्ट -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथे आ. राणाजगजितसिंह पाटील आले असता राखी बांधण्यासाठी महीलांनी गर्दी केली होती.

१८ ऑगष्टला आ. राणाजगजितसिंह पाटील तेर येथे आले असता रक्षाबंधन निमित्ताने राख्या बांधण्यासाठी महीलांनी गर्दी केली होती.





# निजामशासित गावातील कुणबी नोंदी शोधण्यासाठी पुनश्च समिती हैद्राबादला जाणार

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० ऑगस्ट -**
निजामकालीन जनगणनेत ३८ टक्के कुणबी मराठा अशी नोंद असून देखील मराठवाड्यातील निजाम शासित गावातील कुणबी नोंदीचे दस्तावेज उपलब्ध होत नसल्याने या भागातील नागरिकांमध्ये अन्यायाची भावना असून जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून कुणबी नोंदी शोधण्यासाठी हैद्राबादला पुनश्च समिती पाठविण्याचे ठरले असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

धाराशिव तालुक्यातील वरुडा, सारोळा गावातील युवकांसह अनेकांकडून कुणबी नोंदी मिळत नसल्याची बाब निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

ब्रिटीश व निजाम राजवटीतील गावांमध्ये कुणबी नोंदीबाबत मोठी तफावत आहे. निजाम राजवटीतील गावांमध्ये कुणबी नोंदीचे खूपच कमी दस्तावेज आजवर उपलब्ध आहेत.



वरुडा गावापासून अगदी २ कि.मी. अंतरावरील ब्रिटीश राजवटीतील उपळा गावामध्ये एक हजारहून अधिक कुणबी नोंदी आढळल्या आहेत, मात्र वरुडा गावातील केवळ एकच नोंद आजवर मिळाली आहे. या अनुषंगाने आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या सूचने प्रमाणे मराठा समाजबांधवांनी जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा केली व त्यांना पत्र देवून कुणबी नोंदीचे दस्तावेज शोधण्यासाठी पुनश्च समिती गठीत करून हैद्राबादला पाठविण्याची विनंती केली.

या समितीमध्ये उप जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यासह मोडी व उर्दू लिपी जाणकार व स्थानिक युवकांचा समावेश करण्याची विनंती केली आहे. तसेच आई तुळजाभवानी मंदीर संस्थानचे महंत तुकोजी बुवा यांनी मंदिराबाबतच्या अनेक महत्त्वपूर्ण नोंदी तेथून प्राप्त केल्या असून त्यांना तेथील बारकावे माहित आहेत.

त्यामुळे त्यांचाही समिती मध्ये समावेश करण्याचे सूचित केले आहे. आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी देखील याबाबत जिल्हाधिकारी यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. जिल्हाधिकारी यांनी समिती गठित करण्याचे मान्य केले असून निवासी उपजिल्हाधिकारी यांना त्या अनुषंगाने निर्देशित केले आहे.

या समितीच्या माध्यमातून मराठवाड्यातील अनेक गावातील कुणबी नोंदी मिळतील व मराठा समाजाला मोठा उपयोग होईल अशी अपेक्षा आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## सर्वोच्च न्यायालयाच्या 'त्या' निर्णयाविरुद्ध आज जिल्ह्यात बंदची हाक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० ऑगस्ट**
अनुसुचित जाती जमातीच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णया विरोधात दि.२१ ऑगस्ट रोजी संपुर्ण भारत बंद करण्यात आला आहे. त्यामुळे धाराशिव जिल्हा बंद करण्यात येणार असल्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांना एका नियोजनाद्वारे एससी, एसटी व भिमसैनिकांच्यावतीने दि.२० ऑगस्ट रोजी दिला आहे.

दि.२१ ऑगस्ट रोजी भारत बंदची हाक पुकारण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने धाराशिव जिल्हा संपूर्ण बंद करण्यात येत आहे.

यावर रिपाई नेते राजाभाऊ ओव्हाळ, बहुजन नेते धनंजय शिंगाडे, पृथ्वीराज चिलवंत, पुष्पकांत माळाळे, कुंदन वाघमारे, विद्यानंद बनसोडे, पृथ्वीराज वाघमारे, यशपाल गायकवाड, भालचंद्र कठारे, मेसा जानराव, आप्पासाहेब शिरसाट, प्रमोद हावळे, रवी माळाळे आदींसह इतरांच्या सह्या आहेत.

## महादेव मंदिराची तोडफोड; सकल हिंदू संघटनेचा नळदुर्गमध्ये मुक मोर्चा





**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२० ऑगस्ट**
पवित्र श्रावण महिन्यात नळदुर्ग जकणी तांडा येथील महादेव मंदिराच्या कळसाची जाणीवपुर्वक तोडफोड करून हिंदु समाजाच्या भावना दुखावणाऱ्या समाज कंटाकावर कडक कारवाई करावी या मागणीसाठी नळदुर्ग शहर सकल हिंदु संघटनेच्या वतीने पुकारण्यात आलेल्या नळदुर्ग बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

त्याचबरोबर यावेळी नळदुर्ग शहर सकल हिंदु संघटनेच्या वतीने दि.२० ऑगस्ट रोजी मुक मोर्चा काढुन याबाबतचे पोलिसांना निवेदन दिले आहे.

सध्या सुरु असलेल्या हिंदु धार्मियांच्या पवित्र श्रावण महिन्यात नळदुर्ग जकणी तांडा येथील महादेव मंदिराच्या कळसाची जाणीवपुर्वक तोडफोड करून हिंदु समाजाच्या भावना दुखावण्याचा प्रयत्न समाजकंटकाकडुन झाला आहे. या घटनेचा नळदुर्ग शहर सकल हिंदु संघटनेच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला आहे. या घटनेच्या निषेधार्थ दि.२० ऑगस्ट रोजी नळदुर्ग शहर सकल हिंदु संघटनेच्या वतीने नळदुर्ग बंद तसेच मुक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. नळदुर्ग बंदला शहरातील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेऊन बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

त्याचबरोबर या घटनेच्या निषेधार्थ नळदुर्ग शहर सकल हिंदु संघटनेच्या वतीने मुक मोर्चा काढण्यात आला. यावेळी मोर्चामध्ये शेकडो हिंदु बांधव सहभागी झाले होते.

मोर्चा मध्ये सहभागी झालेल्या हिंदु बांधवानी काळ्या फिती लावुन या घटनेचा निषेध केला. नळदुर्ग शहर सकल हिंदु संघटनेच्या वतीने नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, नळदुर्ग जकणी तांडा येथील हिंदु धार्मियांचे आराध्य दैवत असलेल्या श्री महादेवाच्या मंदिराची विटंबना केल्याची घटना घडली असुन या घटनेमध्ये एकापेक्षा जास्त समाजकंटकांनी एकत्र येऊन हे कृत्य केले असण्याची आहे.या घटनेमुळे हिंदु धार्मियांच्या भावना दुखावल्या आहेत.

अशा प्रकारच्या घटना नळदुर्ग शहर व परीसरात वारंवार घडत असल्याने असे कृत्य करणाऱ्या समाजकंटकांना वेळीच आळा घालणे गरजेचे आहे.

असे कृत्य करणाऱ्यांच्या मागे सुत्रधार कोण? आहे याची उच्चस्तरीय चौकशी करून त्या समाज कंटकावरती कायदेशीर कारवाई करावी अन्यथा येणाऱ्या काळात सकल हिंदु समाजाच्या वतीने अतितीव्र प्रकारचे आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

या निवेदनावर हजारो हिंदु बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## नवोदय विद्यालयात सद्भावना दिवस साजरा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० ऑगस्ट -**
पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात नवोदय जनक राजीव गांधी यांची जयंती सद्भावना दिन म्हणून दि.२० ऑगस्ट रोजीसाजरी करण्यात आली. सर्व प्रथम विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एस.एस. माने यांच्या हस्ते राजीव गांधीच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

व्यासपीठावर हरी जाधव, स्मिता पवार उपस्थित होत्या. या कार्यक्रमास विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक वृंद उपस्थित होता. संस्कार नायकिंदे या विद्यार्थ्याने राजीव गांधींच्या कार्याविषयी माहिती सांगितली. अध्यापिका स्मिता पवार यांनी ग्रामीण भागातील प्रतिभावान विद्यार्थ्यांना शिक्षणाची कशी संधी राजीव गांधी यांनी कशी निर्माण करून दिली. प्राचार्य माने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, ग्रामीण भागातील प्रतिभावान विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी म्हणून प्रत्येक जिल्ह्यातील नवोदय विद्यालयाची स्थापना केली. संगणकीय प्रणाली व तरुण वर्गाला संधी दिली. हे सांगून त्यांचे राहिलेले अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. सद्भावना रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीसाठी हरी जाधव, धनाजी देशमुख, सुनेत्रा अलसेट, बसवराज कोरकर, निषाद भुते, छाया घोटणकर यांनी परिश्रम घेतले.

## सोशल मिडिया हे जनसंपर्काचे प्रभावी माध्यम : किरण गायकवाड



उमरगा-लोहारा तालुक्यातील सोशल मिडिया सैनिकांचा मेळावा संपन्न...


**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२० ऑगस्ट**
उमरगा-लोहारा तालुक्यातील शिवसेना सोशल मीडिया सैनिकांचा मेळावा मंगळवार दि.२० ऑगस्ट २०२४ रोजी श्री.मंगल कार्यालय, उमरगा येथे संपन्न झाला. यावेळी उपस्थित शिवसैनिकांना शिवसेना सोशल मीडिया सेलचे योगेश्वर पुरोहित यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात उमरगा तालुका युवा सेना व सोशल मीडियाची कार्यकारिणी जाहीर करून त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये विनोद कोराळे यांची (युवा सेना तालुकाप्रमुख उमरगा), माधव पाटील व उद्धव बिराजदार यांची (युवासेना उपतालुकाप्रमुख उमरगा), सचिन आलंगे, श्रीनिवास मदनसुरे व जुबेर मुर्षद यांची (युवासेना उपशहर प्रमुख उमरगा), तसेच पंकज जगताप, गणेश शिंदे, अभिषेक घाडगे, आकाश पवार, मुर्तुझा मुंगळे, श्रीशैल टोंपे या सर्वांची (सोशल मीडिया समन्वयक) या पदांवर नियुक्ती करण्यात आली. सध्याच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हे जनसंपर्काचे सर्वात प्रभावी माध्यम असुन शिवसैनिकांनी या माध्यमाचा आपल्या पक्षाचे विचार, धोरण, मुख्यमंत्र्यांनी घेतलेले लोकहिताचे निर्णय, शासनाच्या लोकोपयोगी योजना व आपल्या लोकप्रतिनिधींनी, नेत्यांनी केलेल्या विकासात्मक व सामाजिक कार्याची महिती लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी उपयोग करावा असे आवाहन युवा नेते किरण गायकवाड यांनी यावेळी बोलताना केले.

तसेच नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी शिवसेना पक्षाच्या वाढीसाठी जोमाने प्रचार व प्रसार करावा, असे आवाहन करीत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

कार्यक्रमास शिवसेनेचे नेते जितेंद्र शिंदे, युवा सेना विभागीय निरीक्षक किरण गायकवाड, युवती सेना निरीक्षक आकांक्षा चौगुले, युवा सेना जिल्हाप्रमुख सचिन जाधव, शुभम चौगुले, लोहारा तालुकाप्रमुख जगन्नाथ पाटील, विधानसभा अध्यक्ष शरद पवार, शहरप्रमुख योगेश तपसाळे, विद्यार्थी सेना तालुकाप्रमुख संदीप चौगुले, युवा सेना शहरप्रमुख अमर शिंदे, महिला आघाडी तालुकाप्रमुख संध्या शिंदे, शहरप्रमुख लताताई भोसले, बी.के.पवार, व्यंकट पाटील, चंद्रशेखर सूर्यवंशी, तुकाराम जाधव आदी शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवराज्याभिषेक सोहळा समितीकडून नुतन पोलिस अधिक्षक जाधव यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० ऑगस्ट**
नूतन जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांची शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिव यांच्या वतीने प्रमुख पदाधिकाऱ्यांसह सदिच्छा भेट घेण्यात आली. याप्रसंगी पोलीस अधीक्षक यांना बुके व पुस्तके भेट देऊन त्यांचा आदर सत्कार करण्यात आला.

पोलीस अधीक्षक यांनी संघटना म्हणून आपण कशा पद्धतीने आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे तसेच सामाजिक काम करत असताना आपण समाजाची कशा पद्धतीने बांधीलकी राखली पाहिजे याचे देखील मार्गदर्शन केले. सामाजिक विषयावरती चर्चा करत असताना शिवराज्याभिषेक सोहळा समिती कशा पद्धतीने आपले सामाजिक कार्य करत आहे. याविषयी चर्चा झाल्यानंतर अधीक्षक यांनी समिती करत असलेल्या मिरवणूक मुक्त शिवजन्मोत्सव सोहळा व सामाजिक कामाबद्दल समाधान व्यक्त केले व हे काम अविरतपणे चालू ठेवावे असे सुचविले.

याप्रसंगी शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे माजी अध्यक्ष धर्मराज सूर्यवंशी, जिल्हाध्यक्ष गौरव बागल, जिल्हा उपाध्यक्ष आकाश कोकाटे, शहराध्यक्ष मंगेश निंबाळकर, आकाश भोसले, योगेश आतकरे, तालुकाध्यक्ष अमोल सिरसट, तालुका सचिव दत्तात्रय जावळे, विभाग प्रमुख हनुमंत तांबे, गुंडोपंत जोशी, अॅड. संजय शिंदे, भैरवनाथ रणखांब अविनाश रणखांब उपस्थित होते.

# दादा, आण्णा, भैय्या, भाऊ, ताईसह तुळजापूर विधानसभेला डझनभर इच्छुक

**तभा वृत्तसेवा / सतीश फत्तेपुरे**
**तुळजापूर, दि.२० ऑगस्ट -**
महाराष्ट्रातील सर्वाच पक्षांना आपल्या कडे हवाहवासा वाटणारा तुळजापूर विधानसभा मतदारसंघात २०१९ मध्ये आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी प्रथमच पहिल्यांदा कमळ फुलविले. लोकसभा निवडणुकीत मात्र या मतदारसंघातून महाविकास आघाडीला मताधिक्य मिळाले. त्यामुळे येथील भाजपचे नेते चांगलेच सतर्क झाले आहेत.

मतदारसंघातील राजकीय समीकरणे पाहता आगामी विधानसभा निवडणुकीत महायुती व महाविकास आघाडीतील नेत्यांमध्ये उमेदवारीसाठी चांगलीच रस्सीखेच पाहावयास मिळणार आहे.

यंदा तुळजापूर विधानसभा मतदार संघाचा विचार केला तर दोन दादा, एक आण्णा, एक भैय्या, दोन भाऊ, एक ताई असे दिग्गज उमेदवार उभे राहण्यासाठी इच्छुक आहेत. या यादीत विधमान आमदार राणाजगजितसिंह पाटील रोहन देशमुख माजी आमदार मधुकर चव्हाण, काँग्रेस जिल्हाध्यक्ष अॅड. धिरज पाटील, अशोक जगदाळे, माजी नगराध्यक्ष देवानंद रोचकरी, सक्षणा सलगर या दिग्गजांन सह अनेक डझनभर उमेदवार इच्छुक आहेत. सदरील या दिग्गज इच्छुकांनी मतदार संपर्क अभियान सुरु केले आहे.



या दिग्गज नेत्यांमध्ये उमेदवारीसाठी काय पण करायाची तयारी आहे. यातील काहीनी विविध पक्षाच्या वरिष्ट नेत्यांकडे उमेदवारी मिळवण्यासाठी जोरदार फिल्डींग लावली आहे, तशा चर्चा मतदार संघात होत आहे.

शिवसेना उबाठा तर अनेकजण काँग्रेसकडुन इच्छुक असल्याची चर्चा आहे. लोकसभा निवडणुकीत ज्यांनी महाविकास आघाडीशी निष्ठा जपत काम केले.

तुळजापूर तालुक्यातुन महाविकास आघाडीला ५२ हजारांची लीड मिळाल्याने महाविकास आघाडीतील सर्वच घटक पक्ष ही जागा आपल्याकडे घेण्यासाठी सरसावले आहे.

विधानसभेसाठी महायुतीकडून विधमान आ. राणाजगजितसिंह पाटील, रोहन देशमुख तर महाविकास आघाडीकडून माजी आमदार मधुकर चव्हाण, काँग्रेस जिल्हाध्यक्ष धिरज पाटील हे मुख्य दावेदार आहेत. माजी नगराध्यक्ष देवानंद रोचकरी, अशोक जगदाळे हे ही निवडणुक लढविण्यास इछुक आहेत तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदपवारगट कडुन सक्षणा सलगर यांच्या नावाची चर्चा आहे.

अजित पवार यांच्याकडून महेंद्र धुरगुडे हेही उमेदवारीसाठी प्रयत्न करीत आहेत. तुळजापूरचे युवा नेते विनोद गंगणे यांनी ही भाजपकडे उमेदवारी मागितली आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### कळंबमध्ये हिंदू-मुस्लिम रक्षाबंधन सोहळा उत्साहात संपन्न

**कळंब, दि.२० ऑगस्ट -**
कळंब धाराशिव विधानसभा संपर्कप्रमुख नितीन लांडगे यांच्या वतीने हिंदू-मुस्लिम एकता रक्षाबंधन सोहळा याही वर्षी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यासाठी पाचशे हिंदू मुस्लिम भगिनी, पोलीस भगिनी उपस्थित होत्या. त्याच बरोबर हिंदू मुस्लिम पुरूषांचीही संख्या लक्षणीय होती. या सोहळ्यात नितीन लांडगे यांच्या वतीने उपस्थित भगिनिंसाठी साड्यांचे आणि चिमुकल्यांना शैक्षिणक किट भेट म्हणून देण्यात आले. याप्रसंगी नितीन लांडगे, गणेश जगताप, निखिल घोडके, भारती गायकवाड, नितीन पाटील, अमर गायकवाड, सुधीर भवर सर, मंदार मुळीक, गजानन चोंदे, शंकर वाघमारे, आबा मुंढे, सचिन सौलखे, महेश कोळपे, सुमित बोरगे, प्रमोद करवलकर, बप्पा चोंदे, सोमनाथ वावरे, विशाल जाधव, नितीन जावळे, करण घुले, इत्यादी उपस्थित होते.



### तेर गावात फवारणी करण्याची नागरिकांची मागणी

**तेर, दि.२० ऑगस्ट -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथे डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढत असल्याने गावात फवारणी करण्याची मागणी नागरिकांनी निवेदनाद्वारे ग्रामपंचायतकडे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, पावसाळा सुरू होऊन दोन-तीन महिने झाले परंतु अद्याप कुठलीही फवारणी केली नाही. त्यामुळे डासाचे प्रमाण गावात खूप वाढले असून अनेक लहान मुले, वयोवृद्ध लोक तापाने फणफणत आहेत. त्यात डेंग्यूच्या रुणांची संख्या खूप आहे. आम्हाला असा प्रश्न पडला आहे की, आपण एखाद्या रुग्णाचा बळी जाण्याची वाट तर बघत बसला नाहीत ना? म्हणून आम्हाला आज गावकऱ्यांच्या वतीने निवेदन देण्याची वेळ आपण आणली. निवेदनाची दखल घेऊन दोन दिवसात गावातील साचलेली घाण साफ करून फवारणी करून घ्यावी अन्यथा आपल्या ग्रामपंचायत कार्यालयात गावातील साचलेली घाण केबिनमध्ये टाकून आंदोलन करण्यात येईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनावर सचिन देवकते, प्रवीण बंडे, पवन माने, आबासाहेब सलगर, शिवाजी पडूवळकर यांच्या सह्या आहेत.



### काँग्रेस कार्यालयात राजीव गांधी जयंतीनिमित्त अभिवादन

**धाराशिव, दि.२० ऑगस्ट -**
भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव येथील काँग्रेस कार्यालयात अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. जिल्हा काँग्रेसचे मुख्य संघटक राजाभाऊ शेरखाने यांच्या हस्ते राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रशांत पाटील, उपाध्यक्ष डॉ. स्मिता शहापूरकर, सरचिटणीस अशोक बनसोडे, तालुकाध्यक्ष विनोद वीर, शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, ज्येष्ठ नेते शहाजी मुंडे, सुनील बडूरकर, प्रभाकर लोंढे, प्रेम सपकाळ, संजय गजधने, कफिल सय्यद, सुभाष हिंगमिरे, स्वप्नील शिंगाडे, धवलसिंह लावंड, सौरभ गायकवाड आदी उपस्थित होते. राजीव गांधी



### स्वामी विवेकानंद विद्यालयात रक्षाबंधन उत्साहात साजरा

**उमरगा, दि.२० ऑगस्ट -**
येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर उमरगा येथे रक्षाबंधनाचे अवचित्त साधून सामूहिक रक्षाबंधन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. दि.२० ऑगस्ट रोजी संपूर्ण शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत च्या मुलींनी स्वतःच्या हाताने इको फ्रेंडली राख्या बनवून आणल्या होत्या. त्या राख्या शाळेतील सर्व मुलींनी सर्व मुलांना व शिक्षकांना स्वतःच्या हाताने बांधल्या. सांस्कृतिक विभाग प्रमुख संगीता भावसार यांनी इको फ्रेंडली राख्या कशा तयार करायच्या याचे प्रात्यक्षिक मुलींना करून दाखवले होते. सूत्रसंचालन व आभार संगीता भावसार यांनी मानले. यावेळी मुख्याध्यापिका सविता लोहार सह सर्व शिक्षक हजर होते.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# विचार-विमर्शाचा संघर्ष!

जनतेच्या मनात संशय आणि संभ्रम माजविल्याने सत्तेच्या राजकारणात कदाचित काही तात्कालिक फायदे होतीलही, पण यातून समाजाचा समंजसपणा आणि जनतेची स्वयंनिर्णयाची क्षमता कमकुवत होऊन समाजव्यवस्थेची मती कुंठित झाली, तर मतांच्या स्वार्थी राजकारणाची मोठी किंमत मोजावी लागेल, याचे भान सध्या राजकारणात दुर्मिळ होताना दिसत आहे. समाज, म्हणजे, जनता समंजस असते हे लोकशाहीचे मूलतत्त्व आहे. या गृहितकाच्या ठाम आधारावरच, निवडणुकीद्वारे मतदानातून राज्यकर्त्यांची निवड करण्याचे सर्वाधिकार लोकशाहीने समाजास म्हणजे मतदारास दिले असल्याने, समाजाच्या विवेकबुद्धीला आव्हान देण्याचे खेळ समाजाविनासच नव्हे, तर लोकशाहीसदेखील परवडणारे नसतात. पण अलिकडे राजकारणाला याचा विसर पडत चालला असून, लोकांच्या मनात संशयाची बीजे पेरणे व संभ्रमाचे वातावरण कायम राहील याकरिता अपप्रचाराचे राळ उठविणे म्हणजेच राजकारण असे काही नेत्यांना वाटू लागले आहे. काही राजकीय पक्षांनी तर हीच नीती धोरण म्हणून राबविल्याने लोकसभेच्या अलिकडेच झालेल्या निवडणुकीतून स्पष्ट झाल्याने, अशा नीतीमुळे अंतिमतः समाजाचेच नुकसान होत असल्याची जाणीव जागी करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. समाजाच्या जाणिवा बोथट झाल्या, स्वतःच्या बुद्धीने विचार करून निर्णय घेण्याचा जनतेच्या क्षमतेशी खेळ सुरू झाला म्हणजे चांगले किंवा योग्य काय आणि अयोग्य काय यांचा सामूहिक निर्णय घेणे कधीकधी अवघड होऊन जाते. गेल्या काही वर्षांत, फेक नॅरेटिव्ह म्हणजे खोट्या बातम्या पेरण्याचे आणि रुजविण्याचे नियोजनबद्ध कारस्थान राजकारणात धुडगूस घालू लागले आणि त्याच्या प्रभावाखाली समाजाचा मोठा वर्ग योग्य अयोग्याची नेमकी निवड करण्याची क्षमता हरवून बसला. लोकसभा निवडणुकीतील अपप्रचाराचा परिणाम या देशाने नुकताच अनुभवला असल्याने, अपप्रचाराचे सारे कारखाने आणि दुकाने उद्ध्वस्त करण्याच्या आव्हानाची जाणीव जागी करणे हेच आता एक मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

गेल्या दहा वर्षांत समाजमाध्यमे नावाचा नवा मंच, माध्यमविश्वाच्या केंद्रस्थानी येऊन दाखल झाला असून, समाज माध्यमाच्या रूपाने माध्यम नावाचे प्रभावी हत्यार अलिकडे जवळपास प्रत्येकाच्या हाती आले असले, तरी माध्यमविश्वाच्या नीतीची जी काही चौकट याआधीच प्रस्थापित झाली आहे, त्याविषयी मात्र या मंचावर फारशी जागरूकता रुजलेली नाही. कानावर पडणाऱ्या किंवा नजरेखालून जाणाऱ्या कोणत्याही बाबींमागचे वास्तव उमजून घेण्यासाठी त्याची नेमकी चिकित्सा करणे, त्याच्या सत्यतेची शहानिशा करणे आणि सत्यतेविषयी पूर्ण खात्री झाल्यानंतरच ती अन्यांपर्यंत पोहोचविणे ही माध्यमांची प्रथम नीती गेल्या काही दशकांपर्यंत मुद्रित आणि दृक्-श्राव्य माध्यमांनीही कटाक्षाने सांभाळली होती. समाज माध्यमांचा मंच प्रबळ होत गेला असता, तरी या नीतीचे त्याला फारसे बंधन राहिले नसल्याने, त्याचा वापर काहीसा शिथिलपणानेच होत गेला आणि समाज माध्यमे प्रस्थापित होण्याआधीच्या त्या काळात माध्यमांनी घालून दिलेल्या वाचन संस्कारांचा समाजाशी विसर पडत गेला. समाज माध्यमाच्या रूपाने प्रत्येकाच्या हाती व्यक्त होण्याचे साधन आल्यामुळे, माध्यमनीतीची जागा मागे गेली आणि केवळ व्यक्त होणे हाच अभिव्यक्तीचा हक्क मानला जाऊ लागल्याने, तो बजावण्याकरिता समाजाची चढाओढ सुरू झाली. नेमक्या याच सामाजिक स्थितीचा फायदा घेऊन राजकारणाच्या आखाड्याने अपप्रचाराच्या दुकानदारीकरिता समाजमाध्यमांचा मंच निवडला असावा. या माध्यमावरून पेरली गेलेली कोणत्याही बाबीची बीजे अन्य माध्यमांहूनही अधिक वेगाने समाजमनात रुजतात आणि त्याला तेथूनच खतपाणी घातले गेले तर ती कल्पनेहूनही अधिक जोमाने फोफावतात, हेही स्पष्ट दिसू लागल्याने फेक नॅरेटिव्ह नावाचा प्रकार प्रभावी होत गेल्याचे दिसते. गेल्या काही महिन्यात राजकारणात फेक नॅरेटिव्हचे उदंड पीक आले. काही वर्षांपूर्वी गावोगावी, रानावनात आणि उभ्या पिकांतही अन्य कोणत्याच वनस्पतीला वाढू न देणाऱ्या एका जंगली वनस्पतीचा फैलाव फोफावत गेला होता. सर्व क्षेत्रे व्यापून टाकणाऱ्या आणि अनैसर्गिकपणे जमिनीवर सत्ता गाजविणाऱ्या या वनस्पतीला काँग्रेस गवत असे नाव दिले गेले आणि त्याचा नायनाट करण्याकरिता हरतऱ्हेचे प्रयत्न सुरू झाले. मात्र त्या जिद्दी गवताचा उपद्रव कमी करण्यात अजूनही संपूर्ण यश आलेले नाही. फेक नॅरेटिव्ह नावाच्या या नव्या गैरवापराचेही काँग्रेस गवतासारखेच झाले आहे.

म्हणूनच, आता राजकारणाच्या आखाड्याने नैतिकतेच्या आणि सामाजिक जाणिवा जपण्याची जबाबदारी ओळखून या माध्यमाचा विवेकी वापर करण्याचा भर देण्याची गरज वाढली आहे. विशेषतः, ज्या बाबी समाजाच्या हिताच्या आहेत आणि ज्यामुळे समाजव्यवस्थेस बळ मिळणार आहे, अशा बाबींवर तात्कालिक राजकारणासाठी फेक नॅरेटिव्हची हत्यारे चालविणे थांबवून, समाजाच्या व्यापक हिताचा विचार करूनच राजकारणविरहित भूमिका घेण्याची गरज आहे. गेल्या काही महिन्यांत, महाराष्ट्रात लाडकी बहीण नावाच्या सरकारी योजनेचा मोठा गाजावाजा झाला. या योजनेद्वारे पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्याची ग्वाही सरकारने दिली आहे. सरकारच्या तिजोरीतून दिला जाणारा हा पैसा म्हणजे एक प्रकारे महिलांच्या सक्षमीकरणाचा वेगळा प्रयोग ठरणार आहे, अशी राज्य सरकारची भावना आहे. कारण असा पैसा हातात आला, की महिलांचा आत्मविश्वास वाढतो, महिलांना लहानमोठे उद्योग सुरू करण्याची प्रेरणा मिळते, कौटुंबिक अर्थकारणात आपलाही सहभाग असल्याच्या भावनेने त्यांच्या क्षमतांना बळ मिळते आणि आर्थिक स्थैर्यामुळे कुटुंबाची जीवनशैली सुधारून अर्थव्यवस्थेलाही बळ मिळते. सरकारच्या लाडकी बहीण योजनेतून राज्यातील कोट्यवधी महिलांना आर्थिक लाभ होणार असल्याने त्याच्या सामाजिक फायद्यांचे हे पैलू लक्षात घेऊन या योजनेचा अधिकाधिक प्रसार व्हावा किंवा त्याचा अधिकाधिक महिलांना फायदा मिळावा अशी भूमिका व्यापक समाजहिताच्या दृष्टीने योग्य ठरते. एसटीच्या प्रवासात महिलांना सवलत दिल्याने महामंडळाचे आर्थिक नुकसान होईल असा प्रचार केला जात होता. मात्र प्रत्यक्षात या योजनेनंतर एसटीच्या उत्पन्नात भर पडून महामंडळास नफादेखील झाला, असा सरकारचा दावा आहे. तथापि, त्या योजनेबाबतही अपप्रचाराचे हत्यार उपसले गेलेच होते. वस्तुतः अधिकाधिक महिलांना अशा योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा यासाठी राजकारणासारख्या प्रबळ क्षेत्राने राजकीय मतभेद किंवा पक्षभेद विसरून समाजास सहकार्य करण्याची गरज असताना, ही योजना फसवी असल्याचा अपप्रचार सुरू झाला. या योजनेतून फार काळ मदत मिळणार नाही, अशा प्रचारातून संभ्रम माजविण्याचे प्रयत्नदेखील झालेले दिसतात. तथापि, रक्षाबंधनाच्या मुहूर्तावर लाखो महिलांच्या खात्यात निधी जमा झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर या फेक नॅरेटिव्हचा मुखवटा उघडा पडला आहे. आता ही योजना दीर्घकाळ सुरू राहावी आणि अधिकाधिक महिलांना त्याचा लाभ घेता यावा यासाठी अर्जांची मुदत वाढवून टाकावी अशी मागणी काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केली, ही राजकीय समंजसपणाची व समाजहिताचा दृष्टिकोन दर्शविणारी बाब म्हणावी लागेल. लाडकी बहीण योजनेतून महिलांच्या सबलीकरणाचा एक वेगळा प्रयोग महाराष्ट्रात सुरू झाला आहे. यातून अर्थकारणास बळ मिळेल असा सत्ताधाऱ्यांचा विश्वास आहे. प्रदीर्घ काळानंतरच्या परिणामांची मीमांसा केली, तर तो फारसा गैर नाही. मात्र, अशा योजना प्रामाणिकपणे राबविण्याची इच्छाशक्ती असायला हवी. अनेक प्रकारे अपप्रचार करण्याचा प्रयत्न फसल्यानंतर या योजनेला आपल्या राजकीय हेतूसाठी नवा साज चढविण्याची स्पर्धा आता सुरू झालेली दिसते. या योजनेस अगोदर विरोध करणाऱ्यांनीदेखील ही योजना स्वीकारली आहे असा याचा अर्थ मानला, तर अशा योजना समाजात रुजविणारे विचार पसरविणे गरजेचे आहे. विमर्शांचा, म्हणजे खोट्या माहितीचा फैलाव करून संघर्षपलीकडे काहीच साधता येणार नाही.

## आंतरराष्ट्रीय

# बांगलादेशातील अभूतपूर्व पेचप्रसंग

**वसंत गणेश काणे**

५ ऑगस्ट २०२४ ला बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांना ज्या पद्धतीने पंतप्रधानपदाचा अचानक राजीनामा देऊन भारतात आश्रय घ्यावा लागला, त्या धक्क्यातून भारतीय जनमानस अजूनही पुरतेपणी सावरले गेले नसण्याची शक्यता आहे. याचे कारण भारत आणि बांगलादेश यातील संबंधच मुळी त्यास्तरावरचे होते. दर महिन्याला नेते जगाच्या पाठीवर कुठे ना कुठे एकमेकांना भेटत होते. अगदी अलिकडे त्या नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कारकीर्दीच्या पंतप्रधान शपथविधी समारंभाला ९ जून रोजी आल्या होत्या. नंतर लगेच त्या २१ व २२ जूनला दोन दिवसांच्या भारतभेटीवर आल्या होत्या. त्या काँग्रेस पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी यांनाही भेटत होत्या. त्या भारताशी उपकाराची आठवण सतत ठेवीत आणि भारताशी सतत संपर्क व संवाद ठेवीत असत. त्यामुळे त्यांना अशाप्रकारे अचानक देशाचे पंतप्रधानपदच नव्हे, तर देशही सोडावा लागणे, हे भारतीयांसाठी धक्कादायक होते. त्यामुळे या घटनेमागे कुणाचे काही कटकारस्थान आहे का, यात कुणी भारतविरोधी शक्ती गुंतल्या आहेत का, याच अंगाने बहुतेक भारतीय विचार करणार, हे स्पष्ट आहे.

आजवर जगाच्या पाठीवरील सर्वात तरुण आणि वेगाने प्रगती करीत असलेले राष्ट्र म्हणून बांगलादेशकडे पाहिले जायचे. बांगलादेशकडे पाहण्याची भारताचीही हीच कौतुकाची भूमिका होती. पण बांगलादेशातील निवडणुका तटस्थ, मुक्त आणि न्याय्य वातावरणात होत नाहीत, असे मत व्यक्त करीत अमेरिकेने निवडणूक प्रक्रिया नीट पार पडावी, अशी अपेक्षा व्यक्त करीत एक मिठाचा खडा टाकला. याबाबतच्या वाटाघाटी सुरूही झाल्या. पण पुढे त्या कुठे अडल्या, हे शेख हसीना यांच्या अवामी लीगने स्पष्ट केले होते. शेख हसीना यांनी आधी पंतप्रधानपदाचा राजीनामा द्यावा आणि तटस्थ हंगामी सरकारच्या नेतृत्वाखाली निवडणुका घ्याव्यात, असा आग्रह धरल्यामुळे विरोधकांसोबत बैठकच झाली नाही, असे सत्तारूढ अवामी लीगने अमेरिकेला अगोदरच कळविले होते. अमेरिकेनेही याबाबत आणखी पुढे पाऊल न टाकण्याचा निर्णय घेतला होता. कारण हे प्रकरण अधिक ताणले तर बांगलादेश चीनकडे वळेल, अशी भीती अमेरिकेला वाटत होती. अमेरिकेचा हा निर्णयही व्यवहाराला धरूनच होता.

बांगलादेशात विरोधी पक्ष नेता असताना हसीना यांच्या अवामी लीगनेच निवडणूक तटस्थ व्यक्तीच्या नेतृत्वाखाली घेण्याची मागणी केली होती, हे खरे आहे. खालिदा झिया सरकारने ती मागणी मान्य करून त्याप्रमाणे राज्यघटनेत



तेरावी दुरुस्तीही केली होती, हेही खरेच आहे. पण २०११ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ही तेरावी दुरुस्ती घटनाविरोधी ठरवली. त्याचा आधार घेऊन शेख हसीना सरकारने हंगामी तटस्थ सरकारची तरतूद रद्द करणारी घटनादुरुस्ती केली. त्यामुळे हा मुद्दा कायमचा निकालात निघाला होता. तो पुन्हा उकरून काढण्यात अर्थ नव्हता, हे स्पष्ट आहे. या तपशिलाकडे अमेरिकादी देश दुर्लक्ष करीत असतील तर त्यांनाच दूषण द्यावयास हवे. हसीना-समर्थकांबरोबरच खालिदा-समर्थकांकडूनही या पेचप्रसंगी भारताने आपली बाजू घ्यावी, अशी मुलखावेगळी मागणी होत होती. पण भारताने तसे केले नाही, कारण तसे करणे हे आंतरराष्ट्रीय संकेतांना धरून झाले नसते. खरे तर शेख हसीना या बांगलादेशातील सर्वांत यशस्वी व दीर्घकाळ सत्तेवर राहिलेल्या राजकारणी आहेत. त्यांनी बांगलादेशाचे राष्ट्रीय उत्पन्न, विकास दर, दरडोई उत्पन्न, व्यापार यांत देशाला वरच्या पातळीवर नेऊन ठेवले आहे. या प्रगतीचे फळ म्हणून बांगलादेशी जनतेनेही हसीना यांच्यावर खूप प्रेम केले व एकंदर २० वर्षे देशाचे नेतृत्व त्यांच्याकडे सोपवले. ते ५ ऑगस्ट २०२४ ला देश व पद सोडेपर्यंत म्हणजे सलग १५ वर्षेपर्यंत त्यांच्या हाती कायम होते. पण मग बिनसले कुठे? तर त्यांना देशांतर्गत राजकारण हाताळता आले नाही. बांगलादेशातील रोजगारी आणि आरक्षणविषयक प्रश्नांचे स्वरूप वेगळे आहे. अनेक बेरोजगारांची तर नागरिक म्हणूनही नोंद का नसावी? या निवडणुकांवर विरोधी पक्षांनी बहिष्कार घातला होता व आंतरराष्ट्रीय निरीक्षकांनीही या निवडणुका निःपक्षपाती नव्हत्या, असे मत नोंदवले होते. त्यानंतर गेल्या जानेवारीत झालेल्या निवडणुकांचाच विचार करायचा, तर या निवडणुकीवर बांगलादेशातील सर्व विरोधी पक्षांनी बहिष्कार घातला होता. मतदानही जेमतेम ४० टक्केच झाले. सर्व जागी जणू शेख हसीना यांचेच समर्थक निवडून आले. अवामी लीगने २९९ पैकी २२२ जागांवर विजय मिळवला. उर्वरित जागांवर जे उमेदवार निवडून आले आहेत, ते अपक्ष आहेत व तेही अवामी लीगचे डमी उमेदवार आहेत, असे बोलले जाते. ही धड एकपक्षीय लोकशाहीही नाही. म्हणूनच, हसीना यांचे पदच्युत होणे व पदच्युत झाल्यानंतर ही अशी एका पक्षाकडे झुकलेली बांगलादेश संसद विसर्जित होणे अपरिहार्य होते. पण उद्रेक एवढ्यावरच थांबलेला नाही. वंगबंधूंच्या पुतळ्याची तोडफोड, अल्पसंख्यकांवर, त्यांच्या प्रार्थनास्थळांवर, पूजास्थानांवर हल्ले सुरू झाले आहेत. सर्व मागण्या मान्य झाल्यानंतरही, न्यायालयांनीही तशी हमी देऊनही बांगलादेशात दमनचक्र शांत होण्याचे नाव घेत नाही. याचा सरळ अर्थ असा होतो की आता सूत्रे कट्टरवाद्यांच्या हाती गेली आहेत. अमेरिका, चीन, रशिया, पाकिस्तान यांच्या मनात बांगलादेशबाबत किंचितही आत्मभाव असण्याचे कारण नाही. बांगलादेशही या देशांकडे याच भावनेने पाहात असणार. मग उरतो कोण? एकटा भारतच. बांगलादेशने भारताबाबत उपकृततेच्या भावाचे राजकीय पटलावर जाहीर प्रदर्शन करायला नको होते.

यावेळच्या दडपशाहीमध्ये केवळ एका पंधरवड्यात ३०० लोक ठार झाले. या असंतोषाचा फायदा हसीना यांच्या राजकीय विरोधकांनी घेतला. जमाते इस्लामीने तर नक्कीच याचा फायदा घेतला आहे. अमेरिकेने हसीना यांच्या विरोधकांना रसद पुरवली नसेल, असे म्हणता येत नाही. चीनला तसेही हसीना यांच्याविषयी प्रेम नव्हतेच आणि पाकिस्तानसाठी तर ही एक नामी संधीच होती. एक भारत सोडला तर देशातल्या व देशाबाहेरच्या विरोधकांना हसीना नकोच होत्या. हसीना यांनी या विरोधकांना संधी प्राप्त होईल, निमित्त मिळेल असे वागायला नको होते. आता भारत-बांगलादेश संबंध, सीमा सुरक्षा, याबाबत नव्याने विचार करावा लागेल, सर्वच प्रकारांच्या अन्य संबंधांबाबतही पुनर्विचार करावा लागेल. तसेच घटनेत धर्मनिरपेक्षतेचा समावेश करण्याचा मुद्दाही मागे पडेल.

गेल्या निवडणुकीतच हंगामी सरकारची विरोधकांची मागणी मान्य केली असती तर हसीना वाजेद यांचा अवामी लीग हा पक्ष कदाचित पराभूत झाला असता. पण विरोधकांना आजच्यासारखे रान मोकळे मिळाले नसते. नुकतेच नोबेल पारितोषिक विजेते नेमस्तमार्गी अर्थशास्त्रज्ञ मोहम्मद युनूस यांना बांगलादेशातील अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार बनवण्यात आले आहे. त्यांच्याकडून अपेक्षा आहेत. बघूया काय काय होतं ते!!

९४२२८०४४३०

## वेध

# सरकारी गुराखी नेमा, कामधेनू गाईंना वाचवा!

**अनिल उमाकांत फेकरीकर**

गोरक्षणी स्वरक्षण ऐसे पूर्वजांचे कथन ही बाब राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेद्वारा लोकांना पटवून दिली. मात्र प्रत्यक्षात त्यांचे विचार लोकांनी अमलात आणलेच नाही. परिणामी आज गोधन पूर्णतः संकटात सापडले आहे. गाय कामधेनू आहे. तिची उपयोगिता इतर पशुंपेक्षा जास्त आहे. तरीही तिच्यावरच संकट यावे, याचे मूळ कारण शोधायला हवे. माझ्या मते, गेल्या २५ वर्षांत अचानक उद्भवलेला गुराख्यांचा अभाव हे फार मोठे कारण आहे.

फार पूर्वी गावात सकाळ झाल्यावर गाईंना रानात चारा खाण्यासाठी नेणारी व्यवस्था अस्तित्वात होती. गुराखी मंडळी नित्यनेमाने यायचे आणि सर्व गाईंना रानात घेऊन जायचे. आज गुराखी नसल्याने गाईंना रानात घेऊन कोण जाणार? हा प्रश्न उद्भवताच गोपालकांचा रक्तदाब वाढला. काही लोकांनी खरोखरच प्रामाणिकपणे मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला. पण कुणालाही फारसे यश आले नाही. अशा अवस्थेत मरता क्या नहीं करता म्हणून गोपालकांनी आपल्यावरील संकट दूर करण्यासाठी गाईंना शहानिशा न करता कुणालाही विकण्याचा सपाटा लावला. यातूनच गाई थेट कत्तलखान्याकडे गेल्या. आता तर हा मार्ग एवढा प्रशस्त झाला आहे की, बहुतांश गोपालकच स्वतःहून गाई कत्तलीसाठी पाठवीत आहेत. ज्यांनी गाईवर जीवापाड प्रेम केले, तिला कामधेनू मानले, तेच तिच्या जीवावर उठले आहेत. याच परिस्थितीतून मार्गक्रमण करणाऱ्या वर्तमान अवस्थेत सरकारी गुराखी नेमा, कामधेनू गाईंना वाचवा हा मंत्र पुन्हा एकदा चलनात यायलाच हवा. आज गाईंना वाचवले नाही तर उद्या त्या नक्कीच नामशेष होतील. तेव्हा गाईंना केवळ चित्रातच पाहायला मिळेल, अशीच स्थिती उद्भवली आहे. याला अनेक जण अतिशयोक्ती म्हणतील, पण हीच वस्तुस्थिती आहे.

या स्थितीत गाईंना वाचविण्याचे सोडून शंभरीसाठी गोधनाला कत्तलखान्यात पाठविणारे दलाल, पोलिस यंत्रणा, गोपालक, शेतकरी, सामान्य नागरिक, सामाजिक कार्यकर्ते केवळ मूकदर्शक बनले आहेत, हेच खेदाने नमूद करावेसे वाटते. पोलिस यंत्रणेने समजा विचार केला तर महाराष्ट्रातून आंध्रप्रदेशात, छत्तीसगड, मध्यप्रदेशात एकाही गाईची तस्करी करता येणार नाही, एवढी शक्ती पोलिसांकडे आहे. पण पोलिस त्या शक्तीचा सदुपयोग न करता दुरुपयोगच करीत आहेत. केवळ पैसा मिळत असल्याने ही संपूर्ण यंत्रणा कत्तलखाना चालविणाऱ्यांच्या दिमतीला उभी झाली आहे. पण हे सर्व चुकीचे आहे. आपणच तारी, आपणची मारी, आपणची या हे तत्त्व पाहता गाईंसाठी आपल्या येथील व्यवस्थाच कर्दनकाळ ठरली आहे. पण एक सांगतो, आजही गाईंना वाचविता येईल. याकरिता थोडा हटके विचार नव्हे प्रयोग करावा लागेल. त्यानुसार सरकारी गुराखी ही संकल्पना प्रत्यक्षात आणावी लागेल. महाराष्ट्रात २८८१३ ग्रामपंचायती आहेत. ४४ हजारांपेक्षा जास्त खेडी आहेत. समजा एका ग्रामपंचायतने प्रायोगिक तत्त्वावर एक सरकारी गुराखी नेमला तर तो सहजतेने १०० गाईंना दिवसभर आसपासच्या वनात चारा खाऊ घालण्याचे काम करू शकतो. यापोटी त्या गुराख्याला प्रती गाय २०० रुपये मिळाले तर गाईंची देखभाल करणाऱ्यास २० हजार रुपये मिळतील. या कार्यात ग्रामपंचायतने मध्यस्थी करून सरकारी गुराख्यास एक गणवेश आणि वेतन वेळेवर देण्यासाठी सहकार्य करावे. ही योजना यशस्वी झाल्यास महाराष्ट्रात २८ लाख ८१ हजार ३०० गाईंचे संगोपन होईल. सुमारे २८ हजार ८१३ युवक-युवतींना सहजतेने गावातच रोजगार मिळेल. सरकारी गुराखी हे पद असल्याने अनेक होतकरू याकरिता पुढे येतील. परिणामी त्यांच्यावर अवलंबून असलेल्या दीड लाख लोकांना आधार मिळेल. गाईंची संख्या कायम राहिल्यानंतर गोबरगॅस यंत्रणा कार्यान्वित करता येईल. नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यात गोबरगॅसचा प्रयोग यशस्वी ठरला आहे. त्या गावातील गावकऱ्यांचा अनुभव पाहता महाराष्ट्रातील ४४ हजार खेड्यात गोबरगॅस यंत्रणा कार्यान्वित केल्यास १००० रुपयांचे गॅस सिलेंडर विकत घेण्याची गरज तेथील गावकऱ्यांना भासणार नाही.

महाराष्ट्रात गोहत्या बंदी कायदा लागू आहे. पण प्रत्यक्षात कत्तलखान्यात सर्वात जास्त गाईंची निर्यात महाराष्ट्रातूनच केली जाते. कारण सरकारी यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी पैशापुढे आंधळे झाले आहेत. त्यांना पृथ्वी सूर्याभोवती नव्हे तर रुपयाच्या नाण्याभोवती फिरत असल्याचेच वाटते. म्हणूनच की काय, ते गाईंना कत्तलखान्यात पाठविणाऱ्या टोळीचे सदस्य बनले आहेत. या सक्रिय टोळीला सरकारी गुराखीच रोखू शकतात. तेव्हा शासनाने याही योजनेचा एकदा तरी अभ्यास करून ती प्रत्यक्षात कार्यान्वित करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

९८८१७१७८५९

## इतस्ततः

# ‘इंडस्ट्री ४.०’चे संदर्भ आणि महत्त्व

**दत्तात्रेय आंबुलकर**

गेल्या दशकातील जागतिक स्तरावरील वाढते औद्योगिकीकरण व व्यावसायिक स्पर्धा यामुळे उद्योगक्षेत्र सर्वार्थाने ढवळून निघाले आहे. पूर्वापार वा परंपरागत तंत्रज्ञान वा उद्योगतंत्र पूर्णपणे बदलून गेले अथवा कालबाह्य ठरले. यातूनच आवश्यकता निर्माण झाली ती नवसंशोधन वा तंत्रज्ञानासह औद्योगिक कार्यपद्धती स्वीकारून त्यांची अंमलबजावणी करण्याची. याला जागतिक स्तरावर मूर्त रूप देण्याचे काम ‘इंडस्ट्री ४.०’ या व्यवस्थापन संकल्पनेने दिले असून, ते अनेकार्थांनी महत्त्वपूर्ण व अनुकरणीय ठरले आहे. परंपरागतरीत्या औद्योगिक क्षेत्रातील मोठ्या व महत्त्वपूर्ण अशा बदलांना औद्योगिक क्रांती असे संबोधिले जाते. या मोठ्या व क्रांतिकारी बदलांमध्ये प्रगत व विकसित अशा तंत्रज्ञान व प्रक्रियेद्वारे व्यवसायाच्या उत्पादनवाढीवर विशेष भर दिला जातो. आजवरच्या औद्योगिक क्षेत्रातील क्रांतीमध्ये खालीलप्रमाणे महत्त्वपूर्ण टप्पे आढळून येतात.

पहिल्या औद्योगिक तंत्रज्ञानविषयक क्रांतीमध्ये उद्योगपद्धती वा प्रक्रियेमध्ये मानवी श्रम व प्रयत्नांच्या जागी पाणी व वाफेचा तांत्रिक पद्धतीने उपयोग करून उत्पादन प्रक्रियेला अभियांत्रिकी वा तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली. त्यात औद्योगिक प्रगती क्रांतीच्या दुसऱ्या टप्प्यात उद्योग प्रक्रियेमध्ये विद्युतपुरवठ्याचा महत्त्वपूर्ण अंतर्भाव करण्यात आला. याच्याच पुढील व प्रगत टप्प्यात विशेष व महत्त्वाची बाब म्हणून उद्योग उत्पादन-प्रक्रियेमध्ये संगणकीकरण व स्वयंचलित प्रक्रियेवर आवर्जून भर दिला गेला. उद्योग आणि औद्योगिक प्रक्रियेत बदलता काळ आणि गरजांनुरूप आवश्यक अशा तंत्रज्ञान व कार्यपद्धतीचा अवलंब केल्याने त्यांचे विविध स्वरूपांतील फायदे आज औद्योगिक क्षेत्राला सर्वदूर व आंतरराष्ट्रीय पातळीवर होताना दिसतात. उद्योग आणि उद्योजकांना वरील तीन प्रमुख टप्प्यांमधील फायद्यांच्या अनुभवांसह अभ्यास करून केवळ सध्याच्याच नव्हे, तर भविष्यातील बदलत्या व वाढत्या गरजा लक्षात घेऊन, त्यांची पूर्तता करण्यासाठी जी योजना आखण्यात आली, त्याला ‘इंडस्ट्री ४.०’ असे नामाभिधान जागतिक स्तरावर देण्यात आले आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय.

वरील पृष्ठभूमीवर उद्योग क्षेत्रात विकसित झालेल्या इंडस्ट्री ४.०ची मुहूर्तमेढ जर्मनीमध्ये २०११ मध्ये रोवली गेल्याचा दाखला दिला जातो. या नव्या औद्योगिक उपक्रमामध्ये मुख्य भर संगणकीकृत माहिती-तंत्रज्ञानाला विकसित करून त्याला बौद्धिक कार्यपद्धतीची व्यापक जोड देण्यात आली. यातून इंडस्ट्री ४.०च्या माध्यमातून उद्योग-व्यवसाय क्षेत्रात अधिक कार्यक्षम, प्रभावी, लवचीक व त्याचवेळी व्यवसायस्नेही कार्यपद्धतीचा स्वीकार करून वाढता प्रसार करण्यावर भर देण्यात आला. यातूनच इंडस्ट्री ४.०चा मुख्य उद्देश उद्योग-व्यवसायाला बदलत्या व प्रगत तंत्रज्ञानाची आणि कार्यक्षमतेची साथ देऊन सार्वत्रिक व्यावसायिक प्रगतीवर भर देण्यावर निश्चित करण्यात आला. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, २०११ मध्ये इंडस्ट्री ४.०ची सुरुवात जर्मनीमध्ये तेथील तत्कालीन सरकारद्वारा सुरू केलेल्या एका महत्त्वाकांक्षी पुढाकारातून झाली. यामागे मुख्य उद्देश होता तो तेथील उद्योगांना अधिकाधिक उत्पादक बनविणे. त्यासाठी जर्मनीतील उद्योग व तेथील काम करणारे या उभयतांमध्ये आपल्या स्व म्हणजेच स्वतःवर आधारित कामाच्या संदर्भातील जबाबदारीची जाणीव करून देण्यात आली. या प्रयत्नांना त्याच्या पुढील टप्प्यात उद्योग-व्यवसायाच्या संदर्भात स्वतःचे आत्मपरीक्षण तंत्रज्ञानासह विकसित शिक्षणाचा अवलंब व त्याच्याच जोडीला कृत्रिम बुद्धिमत्तेवर भर देण्यात आला. यातूनच जर्मनीतील उद्योगांनी अल्पावधीतच संगणकीय कार्यप्रणालीपासून प्रगत तंत्रज्ञान यंत्रमानवाचा उपयोग यशस्वीपणे करण्यास सुरुवात केली. वर्ल्ड इकोनॉमिक फोरमद्वारा नमूद केल्यानुसार इंडस्ट्री ४.०मुळे उद्योगांना जागतिक स्तरावर एक नवी दिशा देऊन गतिमान करण्याचे महनीय काम केले आहे. यातूनच विविध क्षेत्रांतील तंत्रज्ञानसुद्धा विकसित होत गेले. याच व्यावसायिक प्रगतीच्या माध्यमातून इंडस्ट्री ४.० मुळे क्रांती निर्माण झाली. यामध्ये प्रगती, उत्पादन प्रणाली व वाढत्या ग्राहकांना वाढीव विक्री व्यवहार हे टप्पे साध्य होत गेले. याचे काही आर्थिक परिणाम झाले व त्यामध्ये प्रामुख्याने उत्पादन व उत्पादकता वाढीमुळे होणारे आर्थिक लाभ, ग्राहकांच्या गरजांनुरूप उत्पादनाची आखणी, दर्जामध्ये सुधारणा, कर्मचाऱ्यांच्या क्षमतेतून उत्पादकता व या सर्वांच्या परिणामी वाढीव ग्राहक समाधान हे सारे फायदे साध्य होत गेले.

प्राप्त परिस्थितीत इंडस्ट्री ४.०चा अवलंब करून त्यांची आपापल्या उद्योग-व्यवसायात यशस्वीपणे करण्यासाठी जागतिक स्तरावर काही निकष निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये प्रगत तंत्रज्ञानाचा वाढता अवलंब, उत्पादन पद्धतीला कृत्रिम बुद्धिमत्तेची साथ देणे व परिणामी उत्पादन क्षेत्रात मोठ्या बदलांसह औद्योगिक क्रांतीला चालना देणे इ.चा समावेश केला जातो.

यासंदर्भात संयुक्त राष्ट्र संघांतर्गत कार्यरत असणाऱ्या युनायटेड नेशन्स कॉन्फरन्स ऑन ट्रेड ॲण्ड डेव्हलपमेंट या संस्थेतर्फे विविध देशांच्या इंडस्ट्री ४.०च्या अंमलबजावणीच्या तयारीच्या संदर्भात आढावा घेऊन प्रकाशित केलेल्या आढावा अहवालात काही महत्त्वपूर्ण बाबी स्पष्ट झाल्या आहेत. या अहवालात नमूद केल्यानुसार, जागतिक स्तरावर प्रगत व आर्थिकदृष्ट्या संपन्न अशा अमेरिका, स्वीडन, सिंगापूर, स्वित्झर्लंड व नेदरलॅण्ड्स यासारख्या देशांमध्ये इंडस्ट्री ४.०च्या अंमलबजावणीने मोठी मजल मारली आहे. याउलट लॅटिन अमेरिका, कॅरेबियन, आफ्रिका यासारखे देश मात्र पिछाडीवर राहिले आहेत. विकसनशील देशांच्या संदर्भात वरील अहवालात नमूद केल्यानुसार इंडस्ट्री ४.०च्या अंमलबजावणीच्या संदर्भात पुरेशा तयारीसह चीनने अहवालात ३५वे स्थान घेतले आहे, तर ब्राझील ४०व्या स्थानावर आहे. त्याखालोखाल इंडस्ट्री ४.० तयारीच्या संदर्भात दक्षिण आफ्रिका ५६व्या स्थानावर असल्याचे यानिमित्ताने स्पष्ट झाले आहे. एक अन्य विशेष बाब म्हणजे, चीनमध्ये नवसंशोधन मोठ्या प्रमाणात होत असले तरी या नावीन्यपूर्ण व नवकल्पनांची अंमलबजावणी करण्यासाठी संगणकीय सेवा यासारख्या मूलभूत सुविधांची वानवा असल्याने चीन यासंदर्भात माघारलेला राहिला. इंडस्ट्री ४.० मध्ये भारताच्या झालेल्या प्रगतीमध्ये ज्या बाबींचे मुख्य योगदान आहे, त्यामध्ये औद्योगिक क्षेत्रही संबंधित संशोधन व विकास, माहिती-तंत्रज्ञान आणि दळणवळणाच्या अद्ययावत सुविधांसह कौशल्यप्राप्त व अनुभवी तंत्रज्ञ आणि कामगारांची उपलब्धता या कारणांचा प्रामुख्याने उल्लेख करण्यात आला. अर्थात, यासंदर्भात भारतापुढे काही आव्हाने पण आहेत. इंडस्ट्री ४.०ची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यतः संगणकीय सेवा व संगणकसुरक्षा या बाबी प्रामुख्याने पुढे केल्या जातात. ५-जी सारख्या दळणवळण वा संवाद तंत्रज्ञानाची उपलब्धता ही बाब भारतासाठी उत्साहवर्धक ठरली आहे. यालाच भारतातील उत्पादन तंत्रज्ञानाचा झालेला विकास व जागतिक स्तरावर घेतली जाणारी नोंद इंडस्ट्री ४.० च्या संदर्भात उत्साहवर्धक ठरली आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### मराठीला अभिजात भाषेचा दर्जा केव्हा मिळणार?

देशाच्या राजधानीत यंदा ९८ वे मराठी साहित्य संमेलन आयोजित केले जाणार आहे. या निमित्ताने या संमेलनाबरोबर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळेल, अशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आशा व्यक्त केली आहे. दिल्ली येथे होत असलेल्या या संमेलनाच्या कार्यारंभप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते. या अगोदरसुद्धा मुख्यमंत्र्यांनी हा विषय नीती आयोगाच्या बैठकीत पंतप्रधानांच्या समोर दिल्लीत मांडला होता. एका आकडेवारीनुसार भारतात हिंदी, बंगाली या भाषांनंतर बोलली जाणारी सर्वात मोठी तिसरी भाषा मराठी आहे. देशातील सुमारे ८.३ कोटींहून अधिक लोक मराठी भाषा बोलतात भारतातील एकूण लोकसंख्येच्या हे प्रमाण ८.८६ टक्के एवढे आहे. जगाच्या दृष्टीने विचार केला तर ती जगात लोकसंख्येनुसार बोलली जाणारी १३ वी भाषा आहे. आतापर्यंत अभिजात भाषेचा दर्जा एकूण सहा भाषांना मिळाला आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा या दृष्टीने अनेक वर्षे प्रयत्न चालू आहेत. आज देशात व राज्यात रालोआचे सरकार आहे. तरी सुद्धा अभिजात भाषेचा दर्जा मराठी भाषेला मिळू शकत नाही, ही खेदाची गोष्ट आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यास अधिक निधी मिळू शकतो. मराठी भाषा ही गेली सुमारे २००० वर्षांपेक्षाही अधिक जुनी आहे. अभिजात भाषेच्या सर्व अटी मराठी भाषा पूर्ण करत आहे. असे असूनही अजूनपर्यंत मराठी भाषेला हा दर्जा मिळालेला नाही.

**शांताराम वाघ**/९६२३४५२५५३

●● ●●

## वाचक पत्रे

### कचरा गाड्यांच्या वेळा निश्चित करा

बऱ्याच नागरिकांची तक्रार आहे की कचरा गाड्या झोनमध्ये वेळेवर येत नाहीत. गाडीवाले आपल्या सोयीनुसार वस्त्यावस्त्यांमध्ये फिरतात. त्यामुळे लोक वाट पाहून कचरा प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये भरतात. रस्त्यावर फेकून देतात म्हणून शहरात कचऱ्याचे उकिरडे वाढले आहेत. म्हणून महापालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांना विनंती आहे की प्रत्येक वॉर्डांत गाडी किती वाजता येईल याची अंदाजे वेळ निश्चित करावी, जेणेकरून लोकांना कचरा टाकता येईल. गाडीवर तसे वेळापत्रक नमूद करावे.

**कृ. द. दाभोळकर**/८९९९१४४४६४

●● ●●

### तृणमूल राज्यात कायदा सुव्यवस्थेचे तीन तेरा

पश्चिम बंगालच्या कोलकाता या राजधानीच्या ठिकाणी असणाऱ्या राधा गोविंद कार वैद्यकीय महाविद्यालयाच्या एका प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरचा कामावर असताना बलात्कार करून खून करण्यात आला. या घटनेने संपूर्ण देश हादरला आहे. या घटनेवर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी चुप्पी साधून आहेत. चौकशी प्रकरण राज्य पोलिस विभागाकडे होते. पण त्यात म्हणावी तशी प्रगती दिसत नसल्याने शेवटी कोलकाता उच्च न्यायालयाने हे प्रकरण सीबीआयकडे सोपविले आहे. या आधीही संदेशखाली या प्रकरणी सुद्धा ईडी अधिकारी तपासासाठी तृणमूल पक्षाचा कार्यकर्ता असलेल्या आरोपीच्या शेख शाहजहां आणि शिवप्रसाद हजाराच्या तेथील घरी गेली असताना त्यांच्यावर समर्थकांनी हल्ला केला होता. ईडीच्या कारवाईनंतर येथील खरे भीषण वास्तव्य बाहेर आले. या प्रकरणातसुद्धा न्याय मागण्यासाठी पीडितांना उच्च न्यायालयात जावे लागले होते. पश्चिम बंगालमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून ममता बॅनर्जी सरकारची दडपशाही चालू आहे. याबाबत उच्च तसेच सर्वोच्च न्यायालयाने सरकारला वेळोवेळी फटकारले, पण ममता बॅनर्जी सरकारच्या भूमिकेत फारसा फरक पडला नाही. कारण ममता बॅनर्जी यांना आपला मुस्लिम तुष्टीकरण हा एकमेव एजेंडा चालवायचा आहे. पश्चिम बंगालमधील वामपंथी पक्षाची सत्ता उलथून टाकण्यासाठी त्यांच्या गुंडगिरीला जशास तसे उत्तर देण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी गुंड प्रवृत्तीच्या लोकांची मदत घेतली होती तीच आज त्यांना राज्य करताना नडत आहे. आज पश्चिम बंगाल आर्थिक तसेच विकासापासून कोसो मैल दूर आहे. काही वर्षांपूर्वी उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षाचे सरकार असताना कायदा आणि सुव्यवस्थेचे जसे तीन तेरा वाजले होते, तसेच आज बंगालमध्ये होत आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

●● ●●

### सर्वपक्षीय हिंदूंनी एकत्रित यावे!

बांगलादेशमध्ये जो अत्याचार सुरू आहे त्याच्या विरोधात भाजपाने राजकीय विचार बाजूला ठेवून नागपूर शहरातील सर्व हिंदूंना आवाहन करून व निषेध मोर्चा काढून संपूर्ण नागपुरात आवाज उठविला पाहिजे. हा आवाज दिल्लीपर्यंत गेला पाहिजे. आता हिंदूंनी पेटून उठायची गरज निर्माण झाली आहे. निवडणुकीच्या राजकारणाकरिता कसे एकत्र येतात. या कारणाकरिता एकत्र आले तर काय हरकत आहे. सध्याची परिस्थिती फार कठीण आहे. टीव्हीवर गलिच्छ राजकारण दाखविले जात आहे. आता हिंदूंनीच बांगलादेशच्या राजकारणाच्या निमित्ताने एकत्रित येणे गरजेचे आहे. बांगलादेशमधून येत असलेले व्हिडीओ पाहताना अतिशय चीड येते.

**केशव कुकडे**/९०११०६६७२६

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जालन्यातील जनतेला हवाय विष्णु पाचफुले यांच्या रूपाने महापौर!

## जालन्याचा विकासाला येणार अर्जुनराव खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली विष्णु पाचफुलेंच्याच काळात गती!



**तभा वृत्तसेवा**
**जालना/सुरेश कवडे पाटील**

विष्णू पाचफुले यांचा शहरात दांडगा संपर्क असून सर्वांशी सलोख्याचे संबंध आहेत. माजीमंत्री अर्जुन खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली गत तीस वर्षापासून शिवसेनेचे काम करत असून, बीस वर्षे नगरसेवक पद सांभाळले आहे. पूर्वीच्या नगर पालिकेचा व आताच्या मनपाचा दांडगा अभ्यास पाठिशी आहे. यामुळे संधी मिळाल्यास नक्कीच तिथे आपण सोने करू असा विश्वास विष्णू पाचपुते यांनी व्यक्त केला.

नगर पालिकेचे रूपांतर आता महानगर पालिकेत झाले असून शहराचा पहिला महापौर कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विविध पक्ष तसेच मात्तबर नगरसेवक आत्तापासूनच व्यूहरचना आखत आहेत. दरम्यान, सोमवार दि. २९ जुलै रोजी शहरात आयोजित एका कार्यक्रमात माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनी शिवसेनेकडून शहरप्रमुख विष्णू पाचफुले हेच उमेदवार असतील असे जाहीर करून टाकल्याने पाचफुले हे महापौर पदाच्या शर्यतीसाठी सब झाले आहेत. जालना शहराचा विस्तार वाढल्याने वर्षभरापूर्वी नगर विकास विभागाने जालना शहराला महानगर पालिकेचा दर्जा दिला. त्यानुसार संतोष खांडेकर यांच्या रूपाने आयुक्त मिळाले असून आता राजकीय दृष्ट्या अतिशय महत्त्वाचे मानले जाणारे महापौरपद कोणाला मिळू शकेल याचे तर्कवितर्क वर्षभरापासून सुरू आहेत. ज्या प्रमाणे नगराध्यक्षांचे सुटले होते त्याचप्रमाणे आरक्षण कोणत्या प्रवर्गाला सुटणार यावरून अनेक गणित अवलंबून असणार आहेत. असे असले तरी गत तीस वर्षापूर्वी सामान्य कार्यकत्र्यापासून आपली राजकीय वाटचाल सुरूवात करणारे व सध्या शहरप्रमुख असलेले विष्णू चकुले हेच



महापौरपदाचे उमेदवार असून यात कोणताच संशय नसल्याचे माजी खोतकर यांनी जाहीर केल्याने पाचफुले यांच्या आशाही पल्लवीत झाल्या आहेत.

# मतदार यादीत बोगस ८ हजार नावे समाविष्ट

## जिल्हा काँग्रेसतर्फे तीव्र आंदोलन करणार - राजाभाऊ देशमुख



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन विधानसभा मतदार संघाच्या प्रारूप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आलेल्या साडे सात ते आठ हजार बोगस नावांबाबत जिल्हा काँग्रेसच्या वतीने आक्षेप घेण्यात आला आहे. सदर बोगस नावं तात्काळ वगळली नाही तर तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी भोकरदन तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

आगामी विधानसभा निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार भोकरदन विधानसभा मतदार संघातील प्रारूप मतदार यादी नुकतीच प्रकाशित करून त्यावर दि. २० ऑगस्ट पर्यंत आक्षेप, हरकती मागविण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने जालना जिल्हा काँग्रेस कमिटीकडुन जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली १०३ भोकरदन - जाफराबाद विधानसभा प्रारूप मतदार यादीत बदनापूर विधानसभा मतदारसंघातील जवळपास साडेसात ते आठ हजार नावे समाविष्ट करण्यात आल्याने त्यावर निवडणूक आयोगाच्या नमुना फार्म नं ७ (नियम १३ (२) आणि २६ पुराव्यासह संपुर्ण यादीचे गठ्ठे आज सोमवारी भोकरदन तहसील कार्यालयातील निवडणूक अधिकारी सपकाळ यांच्याकडे दाखल करण्यात आले आहेत. याप्रसंगी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख म्हणाले की, या मतदार यादीत अंदाजे २२ हजार ४०० मतदारांची दुबार नावे असून बदनापूर मतदारसंघातील बोगस नावे भोकरदन शहरात अंदाजे साडेसातशे ते आठशे असून शहरात दुबार नावे अंदाजे पंधराशे ते सोळाशे आहेत. ही सर्व बोगस नावे मतदार यादीतून तात्काळ वगळण्यात यावी नसता जालना जिल्हा काँग्रेस कमिटीकडुन तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील देशमुख यांनी यावेळी दिला.यावेळी तालुकाध्यक्ष त्रिंबकराव पाबळे, उपाध्यक्ष इरफान सिद्दीकी, नगरसेवक अन्नदाते, रमेश जाधव, सोशल मीडियाचे सोपान सपकाळ, प्रतीक देशमुख, रामचंद्र गायके, रोषण देशमुख, काकासाहेब ढवळे, संभाजी देशमुख यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# संक्षिप्त

## पोलीस मुख्यालयात आज रक्तदान व मधुमेह निदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

रोटरी क्लब फ जालना इलाईट, जालना पोलीस व जनकल्याण ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिनानिमित्त पोलीस, त्यांचे कुटुंबीय व जनतेसाठी भव्य महारक्तदान शिबीर व मोफत मधुमेह निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवार दि. २० ऑगस्ट रोजी पोलीस मुख्यालयातील बॅडमिंटन हॉलमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित या शिबिराचा पोलीस अधिकारी, कर्मचारी, पोलीस कुटुंबीय आणि जनतेने मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, रोटरी क्लब फ जालना इलाईटचे अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल, सचिव अनया अग्रवाल, रोटरी इंटरनॅशनल डायबिटीज डायरेक्टर डॉ. राजेश सेठिया यांच्यासह क्लबचे पदाधिकारी आणि सदस्यांनी केले आहे.

## रामदास बारगजे यांना महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

शेती क्षेत्रातील बहुमूल्य योगदानाबद्दल भराडखेडा ता. बदनापूर येथील प्रगतशील शेतकरी रामदास बारगजे यांना ओम बेल च्या वतीने महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. नाशिक येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात ब्लूम इंडिया चे ललित जोशी आणि मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. रामदास बारगजे यांनी शेती विषयक नवीन तंत्रज्ञान,नैसर्गिक,सेंद्रिय शेती,विविध फळबाग लागवड,यासोबतच शेतीत नवनवीन प्रयोग करून उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांच्या योगदानाची दखल घेत सदर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल रामदास बारगजे यांचे कुटुंबातील सदस्यांसह नातेवाईक, पंचक्रोशीतील ग्रामस्थ व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## पारध येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला जिल्हा परिषद शाळेमध्ये मुख्याध्यापक डी बी सोनोने राजश्री महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉराज-राम डोईफोडे ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सरपंच शेखर श्रीवास्तव जयस्तंभ चौकामध्ये शेख रशीद जनता विद्यालयामध्ये संस्थेचे अध्यक्ष बीएम लोखंडे स्वर्गीय राजेंद्रजी श्रीवास्तव महाविद्यालयामध्ये गावातील प्रगतिशील शेतकरी नामदेव तबडे यांच्या हस्ते ध्वजारोहणकरण्यात आले तसेच विविध कार्यालयामध्ये ध्वजारोहण करण्यात आलेया ध्वजारोहणास माजी सभापती परमेश्वर लोखंडे माजी सरपंच गणेश लोखंडे दत्ता लोखंडे तसेच स्वातंत्र्यसैनिक माजी सैनिक सर्व शिक्षक व आशा सेविका अंगणवाडी सेविका आरोग्य सेविका तलाठी कुलकर्णी व अन्य शासकीय कर्मचारी व गावातील सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने हजर होते.

# स्वतंत्र्य दिनी शालेय गणवेश वाटप न केल्याने जाफ्राबाद येथे अर्धनग्न अंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/समाधान पाटील**

जाफ्राबाद येथे स्वराज्य संघटना व प्रहार जनशक्ती पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने अर्धनग्न अंदोलन करण्यात आले विध्यार्थी वर्गाला १५ ऑगस्ट स्वतंत्र्य दिनी शालेय गणवेश वाटप न केल्यामुळे तसेच आज पर्यंत ही गणवेश उपलब्ध न झाल्याने संतप्त झालेल्या विकास जाधव,सुनील पंडित, शरद पंडित, तानाजी पंडित,सागर खेकाळे, लहू सिरसाठ, शिवम जाधव, अंश परिहार, नारायण सोन्नी,सिद्वेश्वर वर्गने, एकनाथ, शिंदे, अरुण जंजाळ, उबेद पठाण दिलीप देवडे, अमोल पवार, मनोहर जंजाळ सिताराम पंडित, भागवत पंडित, रुपेश पंडित, संदीप म्हात्रे यांनी अंदोलन केले विकास जाधव यांनी बोलताना सांगितले की सरकार चा खाजगी करणाकडे कल असल्यामुळे शासकीय जिल्हा परिषद शाळेकडे दुर्लक्ष केल्या जातंय शिवाय शिक्षक ही उपलब्ध केल्या जात नाही शिक्षक शाळेना मिळवून देण्यासाठी ही आम्हाला अनेक वेळा अंदोलन करावे लागले, गरीबाची शाळा म्हणून जिल्हा परिषद शाळेचे अस्थीत्व निर्माण झालेय तेही सरकर बंद करण्याच्या मनस्थिती मध्ये होते शाळा दत्तक योजनेच्या माध्यमातून परंतु वाढता विरोध लक्षात घेता तो निर्णय मागे घ्यावा लागला खाजगीकरणामुळे देशात शिक्षणाचे वाटोळे होतांना दिसत आहे हे कुठं तरी थांबले पाहिजे पालक वर्गाने जागृत राहून विध्यार्थी वर्गाच्या सुविधा शासनाकडून मिळवून घेतल्या पाहिजे आजच्या अंदोलनाची दखल न घेतल्यास येणाऱ्या काळात पुढील अंदोलन हे शिक्षणमंत्री दिलीप केसरकर यांच्या घरवार करण्यात येईल.



# अ.भा. छावा संघटनेच्या वतीने विविध मागण्यासाठी उपविभागीय कार्यालयासमोर धरणे आंदोलनास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**



अ.भा.छावा संघटनेच्या वतीने श्रावण बाळ योजेनेअंतर्गत प्रलंबीत फाईल तात्काळ मंजुर करणे, सिल्लोड भोकरदन शटल बससेवा सुरु करण्यात यावी,जाफ्राबाद डेफो अंतर्गत भोकरदन बसस्थानकात बसची संख्या वाढवण्यात यावी, परिवहन विभागात वाहक,चालक,व लिपिक पदाची भरती तात्काळ करण्यात यावी,तालुक्यातील मौजे गोकुळ,मुठाड या गावाला बससेवा सुरू करण्यात यावी, मौजे मालखेडा येथे मुख्य महामार्गावर गतिरोधक बसवण्यात यावे,या राज्य परिवहन विभागाकडे केलेल्या मांगण्यासह जालना जिल्हासह तालुक्यातील केंद्रिय प्राथमिक शाळांमध्ये सोलार पॅनल बसवून जे अगोदर सोलार पॅनल बसवले आहे त्यांच्या बॅटरीक उपलब्ध करून याव्या अशी मांगणी शिक्षण विभागाकडे करण्यात आली. तालुक्यातील आदी विविध मांगण्यासाठी अ. भा. छावा संघटनेच्या वतीने संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्ता पाटील ठाले यांच्या नेत्रुत्वात बेमुदत धरणे आंदोलनास आजपासुन सुरुवात झाली. या आंदोलनात संघटनेचे मराठवाडा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर गायकवाड,ता.अध्यक्ष विष्णु पाटील गाढे,शहराध्यक्ष नंदकिशोर जाधव,प्रसिद्धीप्रमुख अप्पासाहेब जाधव, छगनराव वनासैं, विश्वास गावंडे,सुदाम गायकवाड आदींचा सहभाग असून आंदोलनास शेतकरी संघटनेचे ता.अध्यक्ष काकासाहेब साबळे,बळीराजा फाउडेशनचे अध्यक्ष नारायण लोखंडे,आम आदमी पक्षाचे जि.उपाध्यक्ष बोरसे गुरूजी,कॉंग्रेसचे ता.अध्यक्ष त्रिंबक पाबळे, सुरेश तळेकर,मा.नगरसेवक शेख नजीर,राष्ट्रवादीचे मा. नगरसेवक कदीर बापु, बंटी काका,अंगद सहाने,गजानन घोडे,आदींसह विविध सामाजिक संघटना राजकीय पक्षातील पदाधिकार्यांनी भेट देऊन पाठिंबा दिला असुन या धरणे आंदोलनास उस्फुर्त प्रतिसाद मिळतांना दिसुन येत आहे.

# विवेकानंद इंग्लीश स्कुलचे बुध्दीबळ स्पर्धेत यश



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत परतुरच्या विवेकानंद इंग्लीश स्कूल चा बोलबाला दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विवेकानंद इंग्लिश स्कूल चा बोलबाला जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी पात्र. ण १७ मुले मूली १४ मुले/मूली १७ मूली १ ) स्नेहल चव्हाण, २) अनुराधा काळे, ३) जागृती काळे, ४) यशश्री भाग्यवान १४ मूली १) जोया शेख, २) आराध्या वायाळ, ३) आदित्री अकात ४) मैथिली कादे, १४ मुले १) वेदांत नरवडे, २) अफदान खतीब, १७ १) अथर्व जोगदंड २) गोरक्ष राहेकर यांनी यश संपादन केले आहे.

# मुख्य रस्त्यावर बेशिस्त लावलेल्या वाहनावर भोकरदन पोलिसांची धडक कारवाई; वाहन चालकाकडून वसूल केला १६ हजारांचा दंड वसूल

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**



भोकरदन येथील मुख्य रस्त्यावर बेशिस्त लावलेल्या व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल, अशा पद्धतीने रस्त्यावर लावलेल्या ३४ दुचाकी सोमवारी एका वाहनातून उचलून भोकरदन पोलिस ठाण्यात नेण्यात आल्या. ही कारवाई स्वतः पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी केली असून संबंधित वाहनचालकांना तब्बल १६ हजार रूपयांचा दंडही ठोठावला आहे . शिवाय अनेक वाहन चालक रस्त्यावरच दुचाकी लावून कामानिमित्त जातात. परंतु, त्या दुचाकींमुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होतो. त्यामुळे अशा दुचाकींसह इतर वाहनांविरुद्ध पोलीस निरीक्षक , किरण बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी कारवाई करत आहेत. दरम्यान पोलिसांनी सोमवारी रस्त्यावर लावलेल्या ३४ दुचाकी उचलून पोलिस ठाण्यात नेल्या. त्यापैकी २६ दुचाकी चालकांना १६ हजार रूपयांचा दंड ठोठावण्यात आला. इतर ८ दुचाकींची कागदपत्रे सादर न केल्याने त्या ठाण्यातच लावण्यात आल्या. ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक किरण बिडवे, पोउपनि कुकलारे, पवन राजपूत, सपोफौ भास्कर जाधव, गणेश पिंपळकर, सुदर्शन मोहिते, पोलिस नाईक विकास जाधव, अरुण वाघ, शरद शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल संदीप भुतेकर, गोपाल सत्वन ,नंदकुमार दांडगे, दीपक इंगळे, लक्ष्मण राणगोते, अनिल गवळी, आदींनी केली.

# परतूर जिल्हा परिषद शाळेसाठी ०१ कोटी ६६ लाख किमतीचा शाळा १३ खोल्यांच्या बांधकामाचे आ.बबनराव लोणीकर यांच्या हस्ते लोकार्पण तर २१ लक्ष रुपये किमतीच्या आवार भिंतीच्या कामाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्रशालेतील विद्यार्थ्यांना सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी या १३ शाळा खोल्यांची निर्मिती करण्यात आलेली असून यासाठी आपण विशेष पाठपुरावा करून या शाळा खोल्या मंजूर करून घेतल्या होत्या आज त्याचे लोकार्पण होत असून लवकरच आणखी ०६ शाळा खोल्यांचे बांधकाम हाती घेण्यात येईल त्यामुळे शाळेतील अकराशे विद्यार्थ्यांची उत्तम शैक्षणिक व्यवस्था होणार असल्याचा आपणास आनंद आहे की विद्यार्थी सुसज्ज अशा नैसर्गिक वाता-वरण आणि परिपूर्ण आसलेल्या इमारतीमध्ये उत्तम ये वातावरणात शिक्षण घेतील परतूर येथील जिल्हा परिषद प्रशा-लेचा नावलौकिक, जिल्ह्यासह मराठवाडा भरामध्ये असून या ठिकाणाहून अनेक विद्यार्थी डॉक्टर इंजिनिअर वकील आयआयटी झाले असल्याचे यावेळी बोलताना आमदार लोणीकर यांनी नमूद केले



ते परतुर येथे, संत रविदास महाराज मंदिरासमोर सभा मंडप १५ लक्ष रू, वैकुंठ धाम स्मशानभूमी येथे सुशोभीकरण २५ लक्ष रुपये, जिल्हा परिषद प्रशालेतील ०१ कोटी ६६ लाख रुपयांच्या १३ शाळा खोल्या च्या इमारतीचे लोकार्पण तसेच २१ लक्ष रुपयांच्या प्रशालेसाठी आवार भिंतीचे बांधकामाचे भूमिपूजन समारंभ प्रसंगी बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, जिल्हा परिषद प्रशालेमध्ये ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने विद्यार्थी येत असतात या विद्यार्थ्यांवर संस्कार घडवण्याचे काम खऱ्या अर्थाने जिल्हा परिषदेचे शालेय व्यवस्थापनातील येथील शिक्षक करत असून याचा आपल्याला अभिमान असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केली. पुढे बोलताना ते म्हणाले की काही भू माफिया जिल्हा परिषद शाळेच्या ऐतिहासिक मैदानावर डोळा ठेवून होते मात्र त्यांचे मैदान घशात घालण्याचा डाव आपण पूर्ण होऊ दिला नसून एक इंच ही जिल्हा परिषद प्रशालेची जागा कुठल्याही भू माफियाच्या घशात जाऊन देणार नसल्याचा सणसणीत इशारा यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला

श्री साईबाबा मंदिराच्या जागेचाही असाच प्रश्न भूमाफ यांनी निर्माण केलेला असून या ठिकाणी भरणारी श्री साई संस्थांची भव्य यात्रा रावण दहन यासारख्या ऐतिहासिक मैदानाला कदापी, कुठल्याही भूमाफ्याच्या घशात जाऊ देणार नसल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले.

दरम्यान माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मंत्री असताना ५० लक्ष रुपये देऊन शादी खाना इमारत मंजूर केली होती मात्र, इमारतीचे बांधकाम करत असताना, इस्टिमेट पेक्षा अधिकचे काम केले गेल्यामुळे हे काम पूर्ण होऊ शकले नाही सध्या या कामासाठी १० लक्ष रुपयाचा निधी मंजूर असून काम पूर्ण करण्यासाठी अजून लागणारा निधी लवकरच उपलब्ध करून देऊन काम पूर्ण करणार आमदार लोणीकर यांनी सांगितले यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव राहुल भैया लोणीकर, भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघन कणसे, ज्येष्ठ नेते भगवानराव मोरे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दया महाराज काटे माजी नगराध्यक्ष कय्युम पठाण, संभाजी वारे रवींद्र सोळंके, बद्रीनारायण ढवळे बंकटराव सोळंके भाजपा शहराध्यक्ष प्रवीण सातवणकर माजी उपनगराध्यक्ष संदीप बाहेकर नगरसेवक प्रकाश चव्हाण कृष्णा आरगडे, नाझीम काझी संतोष हिवाळे मलिक कुरेशी मुज्जू कायमखानी, इजरान कुरेशी,विजय यादव बंडू पाचारे कुलदीप बिंनगे दत्ता वाघमारे रंगनाथ पतंगे बेगाजी सोनटक्के विठ्ठल सोनटक्के, संजय बिनगे, गणेश गोरे व्यंकट जुल्फ कार बागवान,सरकटे रामेश्वर लहाने महादेव खाटीक मारे नरेश सोनवणे रामदास जाधव महादेव माने बबलू शेख शहाणवाज कुरेशी गटविकास अधिकारी श्री राजेश तांगडे, गटशिक्षणाधिकारी संतोष साबळे, उपकार्यकारी अभियंता संतोष सुगंधे, जि प प्रा शालेचे मुख्याध्यापक गणेश राठोड, विस्तार अधिकारी डॉ अंजली कोळकर, विष्णू कदम विष्णू ढवळे कल्याण बागल यांच्यासह शिक्षक पालक विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आ.लक्ष्मण आण्णा मुळे मतदारसंघात रस्त्याचे जाळे निर्माण होत आहेत- शिवराज पवार

## २ कोटी १७ लक्ष रुपयांच्या सिमेंट रस्ता कांमाचा शिवराज पवारांच्या हस्ते शुभारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२० ऑगस्ट**

मतदारसंघातील गाव तिथे रस्ता करण्यासाठी आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी प्रमाणिक प्रयत्न करत आजपर्यंत विधानसभा मतदारसंघात रस्त्याचे जाळे निर्माण होऊन दळणवळणांचा मार्ग सुकर झाला आसल्याचे शिवराज पवार यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना सांगितले ते म्हणालेकी आण्णा आमदार होण्या आगोदर मतदारसंघाची अत्यंत दैयनीय आवस्था होती त्यामुळेच गेवराई मतदारसंघातील जनतेने परिवर्तन घडवून आण्णांना दोन वेळेस निवडुन दिले आहे जनतेने दाखवलेला विश्वास सार्थ करण्यासाठी आ.लक्ष्मण आण्णांनी जनतेशी प्रमाणिक प्रयत्न करत आसल्यांचे युवानेते शिवराज पवार यानी यावेळेस म्हटले आहे



विधानसभा मतदारसंघाचे आ.लक्ष्मन आण्णा पवार यांच्या प्रयत्नातून ह्यांब्रियट ऑन्युईटी योजनेंतर्गत गेवराई जातेगाव रोडवर मोढा नाका ते १३२ kv पर्यंत १ कि.मी. सिमेंट रस्ता कामांचा शिवराज पवार यांच्या शुभारंभ संपन्न झाला. आ. लक्ष्मण आण्णा पवार यानी प्रयत्न करत जातेगाव रोडवर मोढा नाका ते १३२ केव्ही पर्यंत १ कि.मी. सिमेंट रस्त्यासाठी २ कोटी १७लक्ष रुपये निधीला मंजुरी मिळवून आज दि.२० ऑगस्ट रोजी सकाळी ११:०० वाजता युवानेते शिवराज पवार यांच्या हास्ते शुभारंभ करण्यात आले.यावेळी अभियंता घुळवे, राहुल खंडागळे, याहीया खॉन, दादासाहेब गिरी,भरत गायकवाड,आप्पासाहेब कानगुडे, अमन सुतार, महादेव बेद्रे,सचिन वावरे,बद्दोदिन,श्रिहारी गंगाधर, लक्ष्मण चव्हाण, प्रल्हाद येळापुरे,करण सुतार, मुन्ना मोटे, रजित डरफे, आब्दुलभाई, श्रीराम घाटुळ, कृष्णा पाटोळे, समाधान मस्के,राजु शेख,मतिन केरेशी,बाबुभाई फिटर,शेख उस्मान, सादेक चाचु,शेख बाबा,शेख मुददशीर, शेख नसिर, बाबासाहेब सावंत, आदी उपस्थित होते. गेवराई शहरातील मोढा नाका येथुन जातेगावरोड वर मोढा नाका ते १३२ केव्ही पर्यंत १ कि.मी. लांबी ते १० मिटर रुंदीचा दर्जेदार सिमेंट रस्ता होणार आहे त्यामुळे परिसरातील नागरिकात समाधान व्यक्त होत आहे.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज बीड दौऱ्यावर

## राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे करणार उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० ऑगस्ट**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज बुधवारी (२१) बीड दौऱ्यावर आहेत. त्यांचा बीड जिल्हा दौरा खालील प्रमाणे.



मुख्यमंत्री दुपारी १ वाजून १५ मिनिटांनी रत्नागिरी विमानतळ येथून शासकीय विमानाने लातूरकडे प्रयाण करतील लातूर विमानतळावर दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी आगमन व हेलिकॉप्टरने परळी येथे येतील.दुपारी ३ वाजता स्व. पंडित अण्णा मुंडे सभामंडप, कृषी उत्पन्न बाजार समिती, कॉटन मार्केट यार्ड, नाथ रोड येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सव या कार्यक्रमासाठी उपस्थित राहतील.सायंकाळी ४ वाजून ३० मिनिटांनी हेलिकॉप्टर वरून लातूर विमानतळाकडे प्रयाण होणार असून सायंकाळी ५ वाजता लातूर विमानतळ येथे आगमन व शासकीय विमानाने मुंबई विमानतळाकडे प्रयाण.

# जेष्ठ नागरिकांना तीर्थक्षेत्र यात्रा घडवणारी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना'

## या मोफत संधीचा लाभ घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० ऑगस्ट**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत जेष्ठ नागरीकांना तीर्थ दर्शन यात्रेची मोफत संधी देण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजन' सुरु करण्यात आली आहे. बीड जिल्हयातील वय वर्ष ६० किंवा त्याहून अधिक वयाचे आहेत त्यांना राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची दर्शनाची संधी देण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरु करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत राज्यामधील ज्येष्ठ नागरिकांसाठी तीर्थक्षेत्र यात्रा मोफत उपलब्ध करुन देणे, सदर योजनेंतर्गत निर्धारीत तीर्थ स्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा एकवेळ लाभ घेता येईल तसेच प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रती व्यक्ती रुपये ३०.०००/- (अक्षरी रुपये तीस हजार) फक्त इतकी राहील जेष्ठ नागरीकांनी योजनेचे माहिती प्राप्त करण्यासाठी व योजनेसंबधी अधिक माहितीसाठी डॉ. बाबासाहेव आंबेडकर, सामाजिक न्याय भवन बीड या कार्यालयाशी संपर्क साधावा व जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण बीड यांनी केले आहे.

योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

योजनेच्या लाभासाठी दि. ३१.०१०२०२४ पूर्वी ऑफलाईन अर्ज तदनंतर ऑनलाईन अर्ज,लाभार्थ्यांचे आधारकार्ड / रेशन कार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र / महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला.लाभार्थ्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्यांचे १५ वर्षाचे रेशनकार्ड तथा ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळख धरण्यात येईल ),सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुंटूब प्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला, (वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापर्यंत असणे अनिवार्य) किवा पिवळे / केशरी रेशनकार्ड,वैद्यकीय प्रमाणपत्र,पासपोर्ट आकाराचा फोटो, जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल क्रमांक, सदर योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र ही कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

# शेतकरी बांधवांनी परळी वैजनाथ राज्यस्तरीय कृषी महोत्सवास भेट देण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० ऑगस्ट**

बदलत्या परिस्थितीत शेतक-यांना उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन देण्यास अनन्यसाधारण महत्व आहे.प्रयोगशील व प्रगतीशील शेतक-यांचे माध्यमातुन शेतक-यांना आपआपसातील विचारांची देवाणघेवाण करण्यास व्यासपीठ उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्यातील आत्मविश्वास वृध्दींगत होऊ शकतो. आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा शाश्वत पध्दतीने अवलंब केल्यास शेतकरी आर्थिक दृष्ट्टया उन्नत होऊन जागतिक पातळीवरील स्पर्धाक्षम वातावरणात आपले स्थान सिध्द करु शकतील. याकरीता धनंजय मुंडे, मंत्री कृषी, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून व प्रमुख मार्गदर्शनाखाली दि. २१ ते २५ ऑगस्ट २०२४ या कालावधीतपरळी वैजनाथ येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या कार्यक्रमाचे उद्धाटनप्रसंगी एकनाथ शिंदे (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), शिवराजसिंह चौहान (मंत्री, कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार),देवेंद्र फडणवीस (उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य) अजित पवार (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), धनंजय मुंडे (मंत्री, कृषी, महाराष्ट्र राज्य तथा, पालकमंत्री बीड जिल्हा), संजय बनसोडे, ( मंत्री, क्रीडा व युवक कल्याण बंदरे,महाराष्ट्र राज्य) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

याशिवाय इतर संसद सदस्य, विधान परिषद सदस्य, विधानसभा सदस्य महोदय व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

राज्यातील शेतकऱ्यांची शाश्वत प्रगती व्हावी, कृषि विषयक विकसीत तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहोचावे, शासकीय योजनांची माहिती शेतक-यापर्यंत पोहोचावी, शेतकरी ते ग्राहक थेट विक्री श्रृंखला विकसीत व्हावी व शेतमालाला चांगला बाजार भाव मिळावा तसेच शेतकरी व वरिष्ठ कृषी शास्त्रज्ञ यांच्यामध्ये थेट संवाद व्हावा म्हणून या प्रदर्शनात ४०० पेक्षा जास्त दालने लावण्यात येणार आहेत. तसेच परिसंवाद, राज्यातील सर्व कृषी विद्यापीठाची दालने, विविध संशोधन केंद्र, कृषी विज्ञान केंद्र, प्रक्रिया उद्योग यांचे विशेष सादरीकरण होणार आहे.

सदरील पाच दिवसाच्या कालावधीमध्ये पौष्टीक तृणधान्य महोत्सव, सेंद्रीय शेती दालन, खरेदीदार विक्रेता संमेलन, पशू प्रदर्शन,ड्रोन द्वारे फवारणी प्रात्यक्षिक, रानभाजी महोस्तव,धान्य व इतर शेतीमाल प्रदर्शन व विक्री, शेती निगडीत औजारे खरेदी विक्री दालन व कृषि उत्पादने, स्वयं सहाय्य महिला बचत गट निर्मित वस्तू /पदार्थ विक्री भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे.महोत्सवात पाच लाखापेक्षा जास्त शेतकरी भेट देतील असे नियोजन करण्यात आलेले आहे. मानवी आरोग्यामध्ये सकस अन्नाचे अनन्य साधारण महत्व आहे. सकस अन्नामध्ये विविध भाज्यांचा समावेश असतो. रानातील म्हणजेच जंगलातील तसेच शेतशिवारातील नैसर्गिकरित्या उगवल्या जाणाऱ्या रानभाज्या, फळभाज्या, कंदभाज्यांमध्ये विविध प्रकारचे शरिराला आवश्यक असणारे पौष्टिक अन्नघटक व औषधी गुणधर्म असतात. तसेच सदर रानभाज्या नैसर्गिकरित्या येत असल्यामुळे त्यावर रासायनिक किटकनाशक / बुरशीनाशक फवारणी करण्यात येत नाही. त्यामुळे पुर्णपणे नैसर्गिक असल्याने या संपत्तीचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. त्यांचे आरोग्य विषयक महत्व व माहिती जास्तीत जास्त ग्रामिण तसेच शहरी भागातील नागरिकांना होणेसाठी व विक्री व्यवस्था करुन रानभाज्यांच्या विक्रीतून शेतकऱ्यांनाही काही आर्थिक फायदा होणेसाठी लोकांमध्ये याबाबत जनजागृती करणेसाठी रानभाज्यांचे प्रदर्शन देखील या कृषी महोत्सवामध्ये आयोजित करण्यात आले आहे.या महोत्सवात कृषी संलग्न विभागांचाही सक्रिय सहभाग असणार आहे.तरी राज्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी कृषी महोत्सवास भेट देऊन लाभ घेण्याचे आवाहन ,महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे, यांनी राज्यातील शेतकरी बांधवाना केलेले आहे.रविंद्र बिनवडे भा प्र से, तसेच दिपाली कदम, अश्विनी भोपळे, अशोक किरनळ्ळी आयुक्त, कृषि बी टी एम उपसंचालक आत्मा (सामेती) कृषि संचालक (आत्मा) महाराष्ट्र राज्य, पुणे आदि यात सहभागी होणार आहेत.

# सुरक्षेचा कायदा लागू करण्यासाठी गेवराईत डॉक्टरांचा निषेध मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२० ऑगस्ट**

कलकत्ता येथे महिला डॉक्टरावर अमानुष अत्याचार करून निर्घण हत्या करण्यात आला, या घटनेच्या निषेधार्थ गेवराईत शनिवारी डॉक्टरांनी निषेध मोर्चा काढला. छत्रपती संभाजी राजे चौक ते तहसील कार्यालय असा हा मोर्चा काढण्यात आला.



कलकत्ता येथील एका वैद्यकीय महाविद्यालयातील महिला डॉक्टरवर अमानुष अत्याचार करून या डॉक्टरांची हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर देशभरात वैद्यकीय क्षेत्रातील संताप व्यक्त केला जात आहे. आरोपींना कठोर शासन करा, वैद्यकीय सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी करा, महिलांवरील हिंसाचार थांबवा. अशा मागण्या करण्यात येऊन तालुका प्रशासनाला मागण्यांची निवेदन देण्यात आले त्यानंतर मयत महिला डॉक्टरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या मोर्चामध्ये शहरातील वरिष्ठ डॉक्टर , आय एम ए, आय डी ए तसेच लॅब टेक्निशियन संघटनेचे सभासद बहुसंख्येने उपस्थिती होते.

# अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे २४ ऑगस्ट रोजी आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२० ऑगस्ट**

अंबाजोगाई शहरा पुरतीच मर्यादित न राहिलेल्या अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन शनिवार दि २४ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. या वार्षिक सर्वसाधारण सभेस बँकेच्या सर्व सन्माननीय सभासद व ग्राहकांनी उपस्थित राहण्याचे अवाहन बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी व मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी केले आहे.

मागच्या सत्तावीस वर्षापूर्वी अंबाजोगाई शहराची आर्थिक गरज लक्षात घेवून केवळ शहरासाठीच राजकिशोर मोदी व त्यांच्या काही निवडक सहकाऱ्यांनी मिळून अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेची सुरुवात केली होती. मात्र आज ही बँक आपल्या आर्थिक बळाच्या जोरावर १८ शाखेच्या माध्यमातून मोठ्या डौलाने व दिमाखात नागरिकांना सेवा देत कार्यरत आहे. आज केवळ अंबाजोगाई शाखेत ३५ हजाराच्या वर ग्राहक आहेत. तर बँकेच्या सर्व शाखांचे मिळून एक लाखाच्या वर ग्राहक आहेत . हे सर्व ग्राहक बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्यावर विश्वास ठेवून आपली जमापुंजी बँकेत जमा करताना दिसून येत आहेत.बँकेच्या वतीने हजारो गरजुवंत सुशिक्षित बेरोजगार , लहानमोठे व्यापारी, हातगाडी व फेरीवाले अश्यांना त्यांचा व आपल्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कर्जाच्या स्वरूपात मदत करण्यात येत आहे . तसेच बँक वेळोवेळी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात देखील अग्रेसर असून ते राबविण्यात यशस्वी देखील झाली आहे .आज बँकेने वार्षिक उलाढालीत ५०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे .या वार्षिक आर्थिक उलढालीचा लेखाजोखा मांडून तो मंजूर करून घेण्यासाठी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा दि २४ ऑगस्ट २०२४ ,शनिवार रोजी संध्याकाळी ६ वाजता आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आली आहे . बँकेच्या वार्षिक सभेनंतर लगेच प्रीती भोज व कलारंजन मुंबई निर्मित महाराष्ट्राची लोकसंस्कृती व संगीत परंपरेचा देखणा आविष्कार उदय साटम व ज्यातो साटम यांचा मराठी लोकधारा हा मराठमोळा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमाचा देखील आस्वाद सर्व ग्राहक, सभासद व शहरवासीयांनी घ्यावा तसेच बँकेच्या २८ व्या आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभेस सर्व सभासद मंडळींनी उपस्थित राहून बँकेस सहकार्य करावे असे आवाहन बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी , उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी तसेच सर्व सन्माननीय संचालक मंडळ तथा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी केले आहे.

# रस्ता अतिक्रमण काढण्यास प्रशासन उदासिन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२० ऑगस्ट**

केज तालुक्यातील जिवाची वाडी तहत हनुमानवस्ती वरील लोकांची तिन वर्षा पासुनची रस्त्याची मागणीचे भिजत घोंगड कायम तसेच रस्त्याची मागणी ग्रामपंचायत कार्यालय,जिवाची वाडी,वस्ती वरील शेतकरी,जिल्हा परिषद शाळा यांनी गेल्या तिन वर्षा पासुन करत आहेत,तहसीलदारांनी चार वेळा स्थळ पाहाणी केली,सुनावणी घेऊन निकाल दिला निकाल लागुन ही आठ महिने झाले परंतु विडा मंडळ अधिकारी सुहास डोरले रस्ता कामास विरोधकांशी संगणमत करुण तत्कालीन तहसीलदार,दुल्हाजी मेंडके,खंडागळे साहेब,अभिजीत जगताप,सचीन देशपांडे यांच्या कारकिर्दीत पण रस्ता प्रश्न सुटलाच नाही.दि.१६ रोजी मंडळ अधिकारी विडा यांना रस्ता खुला करण्याचे आदेश मंडळ अधिकारी विडा यांना असलेने श्रीमीती आशा वाघ नायब तहसीलदार, केज.उत्रेश्वर घुले तलाठी जिवाची वाडी,भूमिअभिलेख केज चे रविंद्र विभूते,केज पोलीस ठाणे चे राजु वंजारे जायमोक्या वर आले असताना त्यानी त्यांच्या कर्तव्यात कसुर केलेचे दिसत आहे .



१)शेतकऱ्यांची मागणी नकाशा वरील शासकीय रस्त्याची आहे.

२)तत्कालीन तहसीलदार अभिजित जगताप यांनी मनमानी ?त्यांनी त्यांची हुशारी दाखवत शासकीय नकाशा वरील रस्ता सोडून पर्यायी रस्त्याचा निर्णय घेतला.

३)निर्णय नदीच्या साईट(बाजुने) निकाल दिला,मात्र विडा मंडळ अधिकारी सुहास डोरले विरोधककांशी संगणमत करून नदीपात्रात रस्ता करण्यासाठी स्थानी पुढाऱ्यांशी हितगुज करत आहेत.

४)सुहास डोरले यांना वरिष्ठांनी बोलाऊन घेऊन रस्ता करण्याच्या सूचना देऊनही दुरलक्ष करतात.

५)डोरले हे स्थानीक पुढाऱ्यांच्या दबावाखाली आहेत ?त्यांच्या ऐवजी खास बाब म्हणून नविन कर्तव्यदक्ष अधिकारी यांची रस्ता कामासाठी नियुक्ती करावी.

६)मा.उप जिल्हाधिकारी,अंबाजोगाई,दिपक वजाळे यांच्याकडून रस्ता प्रकरण निकाली काढण्याची शेतकऱ्यांची अपेक्षा

# लोकमान्य टिळक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दिला सामाजिक समरसता व वृक्षसंवर्धनाचा संदेश

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२० ऑगस्ट**

रक्षाबंधन या पवित्र सणाचे औचित्य साधून पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विस्तार सेवा कार्य विभाग आणि संस्कार मंडळाच्या वतीने दि.२०ऑगस्ट २०२४ मंगळवार रोजी गावातील भटक्या जाती,ज्येष्ठ नागरिक,माजी विद्यार्थी,आजी-माजी सरपंच,ग्रामपंचायत सदस्य,आरोग्य सेवक,ऑटोरिक्षा चालक तसेच जि.प.प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षक कर्मचारी गण इ.घटकांना प्रत्यक्ष भेटून आणि घरोघरी स्वतः लावलेल्या वृक्षांना राखी बांधून सामाजिक समरसता व वृक्ष संवर्धनाचा संदेश दिला.

रक्षाबंधन निमित्त शाळेत संपन्न झालेल्या कार्यक्रमात जेष्ठ शिक्षक ज्ञानेश मातेकर यांनी विद्यार्थ्यांना रक्षा बंधनाचे पौराणिक तथा ऐतिहासिक महत्त्व विस्तृतपणे सांगितले. विस्तार सेवा माध्यमिक विभाग अध्यक्ष तथा विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयराव विभूते यांनी विद्यार्थ्यांना विविध उदाहरणातून सामाजिक समरसता याविषयी माहिती सांगत विद्यार्थ्यांनी वृक्ष संवर्धन चळवळीचा गावभागात सर्वदूर प्रचार आणि प्रसार करावा असे आवाहन केले.सदरील उपक्रमात इ.८वी ते १०वीतील विद्यार्थी,सर्व शिक्षक,कर्मचारी यांनी उत्साहात सहभाग घेतला.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत जिल्हाधिकारी कार्यालयावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचा आक्रोश मोर्चा

## शेतकऱ्यांना कर्ज माफी देऊन सातबारा कोरा करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० ऑगस्ट**



शरदचंद्र पवार राष्ट्रवादी गटाच्यावतीने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करा या मागणीसह इतर मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालय आक्रोश समोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे पदाधिकारी तसेच शेतकरी सहभागी झाले होते.

सातत्याने जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे बँकाचे कर्ज तसेच खासगी सावकारांचे कर्जामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यातच बँका शेतकऱ्यांना पीककर्ज देतांना हात आखडता घेत असल्यामुळे अनेक शेतकरी पीककर्जापासून वंचीत आहेत. अशा परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे. शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कमही मिळाली नाही. त्यामुळे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अनिल पंतगे आणि तालुकाध्यक्ष बंडू मुटकुळे यांनी केले.

येथील शिवाजी महाराज चौकातून मोर्चाला सुरूवात झाली. शहरातील जुनी नगर पालिका, इंदिरा चौक, बसस्थानकासमोरून हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालचावर धडकला. यावेळी माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष निहाल, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष मनिष आखरे, माधव कोरडे, अशोक शिरामे, भाऊराव ठाकरे, संचीत गुंडेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चाचे रूपांतर सभेमध्ये करण्यात आले. यावेळी माजी मंत्री दांडेगावकर यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर सडकून टीका केली.

यावेळी जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांचेमार्फत मुख्यमंत्र्यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करून सातबारा कोरा करावा, पीकविम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, वन्य प्राण्यांमुळे पिकांची होणारी नासाडी आणि नुकसान भरपाई देण्यात यावी, पीक कर्ज वाटप, पुर्नगठन करून नवीन पीक कर्ज देण्यात यावे, सोयाबीन व कापूस या पिकांना हमी भाव वाढवून द्यावा, वीज जोडणी, सोलार पंप, नवीन आणि जुने रोहीत्र त्वरीत दुरूस्त करून वीजेचा प्रश्न मार्गी लावावा, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून घेत असणाऱ्या विहीर, गोठे मंजूर करण्यासाठी होत असलेली पिळवणूक थांबवावी, असंघटीत कामगार नोंदणीमध्ये होत असलेला भ्रष्टाचार थांबवावा, सरकारी परीक्षांमध्ये सतत होत असलेला घोटाळा थांबवून नोकरभरती लवकरात लवकर करावी आदी मागण्यांचा समावेश आहे. यावेळी रविंद्र गडदे, उमेश देशमुख, गुलाब भोयर, अमोल मोरे यांच्यासह मोठ्या संख्येने राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शेतकरी सहभागी झाले होते.

# आमदार सातवांना तीन तालुका प्रमुखांची तरी ओळख आहे का?

## उबाठाचे खासदार आष्टीकर यांचा सवाल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० ऑगस्ट**

काही दिवसांपूर्वी काँग्रेसच्या आ. डॉ प्रज्ञा सातव यांनी जिल्ह्यातील तीनही विधानसभा मतदारसंघ काँग्रेसला मिळाल्यास आम्ही निवडून आणू असे विधान करीत उबाठा शिवसेना आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला डिवचले होते. याबाबत उबाठा शिवसेनचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांना पत्रकारांनी विचारले असता आ. डॉ प्रज्ञा सातव यांना काँग्रेसच्या तीन तालुका प्रमुखांची तरी ओळख आहे काय असा सवाल करीत लोकसभेत त्यांनी महाविकास आघाडीचे काम केलेच नसल्याचा पुनरूच्चार केला. त्यामुळे महाविकास आघाडीत विधानसभेच्या निवडणुकीत जुंपणार असल्याचे दिसत आहे.

हिंगोली विधानसभा मतदार संघात आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापत आहे. महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या काँग्रेसकडून तीनही विधानसभा मतदार संघात आढावा बैठका घेण्यात आल्या. त्यानंतर आ. प्रज्ञा सातव यांनी हिंगोली जिल्ह्याच्या तीनही विधानसभा काँग्रेसला सोडल्यास आम्ही निवडून आणू असा दावा केला होता. त्यामुळे उबाठा शिवसेना आणि राष्ट्रवादी शरद पवार यांच्या गटाला डिवचल्याचे बोलले जात आहे.

त्यानंतर उबाठाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी दि १९ ऑगस्ट रोजी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.. यावेळी त्यांना हिंगोली जिल्ह्यातील तीनही विधानसभा मतदार संघ काँग्रेसला सोडण्याची मागणी काँग्रेसच्या आ. प्रज्ञा सातव यांनी केली असल्याचे सांगताच त्यांनी आ. सातवांना तीन तालुका प्रमुखांची नावे तरी माहीती आहे काय असा सवाल केला. डॉ प्रज्ञा सातव आमदार असल्या तरीही त्यांचा संघटनेशी कुठल्याही प्रकारचा संबंध नाही. मागणी करायचे त्यांचे काम आहे ते करतील. सर्वच पक्ष आपापल्या पातळीवरून मागणी करतात. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या गाव पातळवरील कार्यकर्त्यापासून ते वरिष्ठ नेत्यांपर्यत सर्वांनीच महाविकास आघाडीचे काम केले. मात्र प्रज्ञा सातव यांनी महाविकास आघाडीचे काम केले नसल्याचा पुनरूच्चार खा आष्टीकर यांनी केला.

विधानसभा निवडणुकीत आमदार, खासदारांनी मागणी केल्यानंतर उमेदवारी दिली जात नाही तर महाविकास आघाडीमध्ये पुर्वी जागा कोणाची होती, आता कोणाची ताकद जास्त आहे, कोण विजयी होऊ शकेल, जिल्ह्यातील राजकीय समीकरण या सर्व बाबी तपासूनच वरिष्ठ पातळीवर जागेबाबत निर्णय घेतला जात असल्याचे खा नागेश पाटील आष्टीकर यांनी सांगितले.

# गणेशोत्सवानिमित्त हिंगोलीत शांतता समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० ऑगस्ट**



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या डीपीसी सभागृहात आगामी श्री गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दि २० ऑगस्ट रोजी शांतता समिती बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी तर मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, मुख्याधिकारी अरविंद मुंढे, सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे विकास पाटील, शहरचे पोनि नरेंद्र पाडळकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी हा उत्सव शांतता आणि सोहार्दपूर्ण वातावरणात साजरा करण्यासाठी शांतता समितीच्या पदाधिकारी आणि सदस्यांची भूमिका मोलाची आहे. सर्व जाती धर्माच्या प्रतिष्ठीत लोकांनी यामध्ये सहभागी होऊन उत्सव आनंदात साजरा करावा. कुठेही अनुचीत प्रकार घडणार नाही याची दक्षता घ्यावी. काही माहीती किंवा घटना घडण्याचा अंदाज आल्यास जवळच्या पोलिस ठाण्याला तत्काळ संपर्क करावा. समता आणि बंधुता या मुल्यांची जोपासना करीत सर्व धर्म समभाव पाळून सणांमध्ये सहभागी होण्याची गरज आहे. समाजकंटकांना कोणताही वाव न देता सर्वांनी गणेशोत्सव साजरा करावा.

यावेळी जिल्हाधिकारी यांनी श्री गणेशोत्सव काळात शांतता समितीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जागरूक राहून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे असे सांगितले.

यावेळी शांतता समितीचे सदस्य मधुकर मांजरमकर, संदेश देमशुख यांच्यासह जिल्ह्याती सर्व पोलीस ठाण्याचे ठाणेदार आदींची उपस्थिती होती. यावेळी शांतता समितीच्या सदस्यांनी मांडलेल्या सुचनांवर चर्चा करण्यात आली.



हिंगोली- येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्यावतीने शेतकऱ्यांनी संपूर्ण कर्जमाफी तसेच इतर मागण्यांसाठी भव्य मोर्चा काढला. यावेळी माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, अनिल पतंगे, बंडू मुटकुळे यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. या मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. छाया- विजय गुंडेकर

# हिंगोली विधानसभेवर राष्ट्रवादी दावा करणार- दिलीप चव्हाण


**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० ऑगस्ट**

हिंगोली विधानसभा मतदारसंघात मागील दोन टर्मपासून काँग्रेस पक्षाचा पराभव होत आहे. त्यामुळे आता ही जागा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला सोडावी अशी मागणी वरिष्ठांकडे करणार असल्याचा दावा जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण यांनी केला आहे.

हिंगोली विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर तीन वेळा विजयी झाले परंतु मागील दोन विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे आ. तान्हाजीराव मुटकुळे हे सलग दोन वेळा विजयी झाले आहेत. या मतदारसंघात काँग्रेस उमदेवाराचा सलग दोनवेळा पराभव झाला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद हिंगोली विधानसभा मतदारसंघात वाढली आहे. त्यामुळे ही जागा पूर्वी पासूनच आम्ही राष्ट्रवादीकडे सोडावी अशी मागणी केलेली आहे परंतु यावेळी महाविकास आघाडीच्या जागावाटपात अदलाबदल करून हिंगोली विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी शरद पवार गटाला सोडण्यात यावा अशी मागणी शिष्टमंडळ वरिष्ठांकडे करणार असून ही जागा राष्ट्रवादीला सुटल्यास निश्चितपणे आमचा विजय होणार असा दावा दिलीप चव्हाण यांनी केला आहे. दरम्यान काँग्रेसनेही तीनही विधानसभा मतदारसंघावर नुकताच दावा केला आहे. हिंगोली विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, माजी नगराध्यक्ष सुधीरअप्पा सराफ, माजी सभापती प्रकाश थोरात यांनीही काँग्रेस पक्षाकडून विधानसभा लढवण्यासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. भाजपमध्येही विद्यमान आ. तान्हाजीराव मुटकुळे आणि लोकसभा प्रमुख रामदास पाटील सुमठाणकर यानीही विधानसभा मतदारसंघात बैठका, सभा घेऊन आतापासूनच तयारी सुरू केली असल्याचे दिसत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### महावितरणकडून ग्राहकांना अव्वाचे सव्वा बिल



हिंगोली- येथील महावितरण कंपनीकडून सर्वसामान्य आणि गोरगरीब ग्राहकांना अव्वाचे सव्वा बिल आकारण्यात येत असल्यामुळे मंगळवारी येथील महावितरण कार्यालयात ग्राहकांची मोठी गर्दी झाली होती. एका वृध्द महिलेस एका खोलीत राहत असूनही तिला २३८० रूपये बील आकारण्यात आले होते. महावितरण कंपनीच्या अनागोंदी कारभारामुळे सर्वसामान्य आणि गरीब ग्राहकांना विनाकारण मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. जिल्हाभरात शहरी आणि ग्रामीण भागात महावितरण कंपनीकडून अव्वाचे सव्वा बिल आकारण्यात येत असल्यामुळे ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून बिलामध्ये विविध कर आकारून बिले वाढवून देण्यात येत असल्यामुळे ग्राहक हैराण झाले आहे. या सर्व बाबींची गंभीर दखल वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घ्यावी अशी मागणी ग्राहकांमधून होत आहे.

### मराठवाडा चेंबर्स ऑफ ट्रेड अँड कॉमर्सच्या उपाध्यक्षपदी गजाननराव घुगे यांची निवड



हिंगोली- येथील व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांच्या कार्याची दखल घेत छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मराठवाडा चेंबर्स ऑफ ट्रेड अँड कॉमर्सच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. हिंगोली व्यापारी महासंघाच्या कार्याची दखल मराठवाड्याच्या वरिष्ठ व्यापारी प्रतिनिधींनी गजाननराव घुगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. एमसीटीसीचे मानसिंग बापू पवार, सत्यनारायण लाहोटी, प्रफुल्ल मालानी, नूतन अध्यक्ष आदेशपाल सिंग छाबडा आदींची उपस्थिती होती.

### दत्त मंदिरात प. पू. वासुदेवानंद सरस्वती जन्मसोहळा

हिंगोली- श्री दत्त मंदिर मंगळवारा येथे श्री प.प.वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज जन्मोत्सव सोहळा दिनांक २४ ऑगस्ट दुपारी ४.४५ वाजता त्या निमित्त दिनांक २३ ऑगस्ट दुपारी ४ ते २४ ऑगस्ट दुपारी ४ पर्यंत अखंड चोवीस तास करुणात्रिपदी होणार आहे. जन्मोत्सव सोहळा कार्यक्रम होत आहे. संध्याकाळी ५ वाजता महाआरती व महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

# वीज पडून शेतकरी महिलेचा मृत्यू तर पती गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० ऑगस्ट**

सेनगाव तालुक्यातील साखरा शिवारामध्ये दि १९ ऑगस्ट सोमवारी दुपारी वीज कोसळून शेतकरी महिलेचा मृत्यू झाला तर पती गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार साखरा येथील रंगनाथ कांदे यांचे साखरा शिवारामध्ये शेत आहे. दि १९ ऑगस्ट रोजी सकाळच्या सुमारास रंगनाथ व त्यांची पत्नी साळूबाई हे दोघेजण शेतात कामासाठी गेले होते. दुपारच्या सुमारास अचानक वीजेच्या कडकडाटासह पावसाला सुरूवात झाली. त्यामुळे त्यांनी काम तसेच ठेवून शेतातील आखाड्याकडे धाव घेतली. मात्र आखाड्याकडे जात असतांनाच त्यांच्या अंगावर वीज कोसळली. अचानक मोठा आवाज झाल्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता घटनास्थळी दोघेही गंभीर अवस्थेत पडलेले दिसून आले. दरम्यान शेतकऱ्यांनी त्यांना तातडीने साखरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी साळूबाई यांना मृत घोषीत केले. या घटनेमध्ये गंभीर जखमी झालेले रंगनाथ कांदे यांच्यावर प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी हिंगोली येथील सामान्य रूग्णालयात हलविण्यात आले आहे. या घटनेची माहीती मिळताच महसूल विभागाचे कर्मचारी पठाण यांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे. मयत साळूबाई यांच्या पश्चात पती, दोन मुले असा परिवार आहे.

# औंढा बस स्थानकाचे काम संथगतीने प्रवाशांचे हाल, व्यापारी बेहाल



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २० ऑगस्ट**

मागील तीन महिन्यांपासून येथील बस स्थानक विस्तारीकरणाचे काम सुरू आहे. सध्या श्रावण असल्यामुळे बारा ज्योर्तिलिंगापैकी आठवे ज्योर्तिलिंग नागनाथाच्या दर्शनासाठी राज्यासह परराज्यातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत आहेत. विस्तारीकरणाच्या कामामुळे बसस्थानकात बांधकामाचे साहीत्य पडल्यामुळे प्रवाशांचे हाल होत असून व्यापाऱ्यांनाही त्याचा फटका बसत आहे.

श्रावण महिना असल्यामुळे आठवे ज्योर्तिलिंग असलेल्या औंढा येथील नागनाथाच्या दर्शनासाठी देशभरातून भाविक दर्शनासाठी येत आहेत. परंतु बस स्थानकाचे विस्तारीकरणाचे काम संथगतीने आणि मनमानी पध्दतीने सुरू असल्यामुळे बसस्थानकात प्रवाशांना उभे राहण्यासाठी जागा नाही. बसेसही गाळ्यामध्ये उभ्या करता येत नसल्यामुळे बाहेरगावाच्या प्रवाशांना बस कुठे लागली याचा अंदाज येत नसल्यामुळे ताटकळत उभे रहावे लागत आहे. बसस्थानक परिसरातच बांधकामाचे साहीत्य टाकल्यामुळे प्रवाशांना धुळीचा तसेच इतर साहीत्यामुळे अडचणीचा सामना करावा लागत आहे.

सध्या अनेक कावड यात्रा, पायी दिंड्यासह भाविकांची मोठी गर्दी होत आहे. बसस्थानकात प्रवाशांना बसण्याच्या जागी सिमेंट टाकल्यामुळे धुळ साचलेल्या बाकावर बसण्याची वेळ आली आहे. बसस्थानक परिसरातील बुक स्टॉल, कॅन्टीन, हॉटेल्स यांच्या व्यवसायावरही मोठा परिणाम होत आहे. याकडे संबंधित विभागाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी प्रवाशी आणि व्यापारी यांचेकडून होत आहे.

# शासकीय आश्रम शाळेत रक्षा बंधनानिमित्त व्यसनमुक्त गटाची स्थापना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० ऑगस्ट**

नशामुक्त भारत अभियान अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय-कळमनुरी आणि नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर पासून जवळच असलेल्या गोटेवाडी येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळेत स्टुडंट्स प्रहरी क्लबची स्थापना दि. १९ ऑगस्ट सोमवारी करण्यात आली.

रक्षाबंधन दिनाच्या नशामुक्त भारत अभियान समितीचे जिल्हा पदाधिकारी तथा सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांचे व्यसनमुक्त रक्षाबंधन विषयावर व्याख्यान पार पडले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एच. डी. बचाटे होते. प्रारंभी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांनी व्यसनांचे दुष्परिणाम विशद केले. यावेळी प्रकल्प अधिकारी डॉ. सुनील बारसे यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांचा व्यसनमुक्ती गटाची स्थापना करण्यात आली. रक्षाबंधनानिमित्त व्यसनमुक्त जीवन जगण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. प्रदर्शनीच देखील विद्यार्थ्यांनी अवलोकन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष समारोप मुख्याध्यापक बचाटे यांनी केला. कार्यक्रमास पी. एस. चिमले, जी. बी. नरवाडे, बी. एच. जारंडे, यु.वी गोळेगावकर डी. एन. शृंगारे यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## बीआएसच्या महाराष्ट्रातील नेत्यांची बीआरएसला सोडचिठ्ठी

# एमआरएस पक्षाची स्थापना

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,२० ऑगस्ट -**

मागील दीड वर्षांपूर्वी महाराष्ट्रात दाखल झालेल्या बीआरएस व त्यांच्या पक्षात प्रवेश केलेल्या राज्यातील अनेक नेत्यांनी बीआरएस पक्षाला सोडचिठ्ठी देत नवा महाराष्ट्र राष्ट्र समिती (एमआरएस) पक्ष स्थापन करण्याचा ठराव घेतला असल्याची माहिती माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे यांनी मंगळवारी आयोजित पत्रकार परीषदेत दिली. यावेळी माजी आ.मनोहर पटवारी, शंकरराव गोडसे, लक्ष्मण वंगे, माधव जाधव यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



यावेळी बोलताना शंकरअण्णा धोंडगे म्हणाले की, मंगळवार (दि.२०) रोजी शासकीय विश्रामगृहात बीआरएस समितीच्या राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला राज्यातील चारही विभागातील नेते उपस्थित होते. बीआरएस पक्षाने लोकसभा निवडणुकीत ज्याप्रमाणे तटस्थ राहण्याची व निवडणूक लढवण्याची भूमिका घेतली होती. आगामी विधानसभा निवडणुकीतही बीआरएसच्या नेत्यांनी निवडणूक न लढवण्याचे सुतोवाच केल्यानंतर आज झालेल्या बैठकीत एमआरएस 'महाराष्ट्र राष्ट्र समिती' हा पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्याने स्थापन केलेला हा पक्ष 'अब की बार किसान सरकार' हे ब्रीदवाक्य घेऊन काम करणार आहे.

मागील दीड वर्षांपूर्वी तेलंगणाचे मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव यांनी ५ फेब्रुवारी २०२३ रोजी महाराष्ट्रात बीआरएस पक्षाचा विस्तार केला होता. त्यांची शेतकऱ्यांविषयी असलेली तळमळ पाहून २६ मार्च २०२३ रोजी लोहा येथे मेळावा घेऊन शंकरअण्णा धोंडगे यांनी बीआरएस पक्षात प्रवेश केला होता. मागील दीड वर्षांच्या काळात झपाट्याने काम करत सदस्य नोंदणी केली होती. बीआरएस पक्षाचे १९ लाख सदस्य झाले होते; परंतु विधानसभा निवडणुकीत उमेदवार देण्याची विनंती केल्यानंतर बीआरएसच्या नेत्यांनी निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यास नकार दिल्याने एमआरएस पक्षाची स्थापना केली आहे.

हा पक्ष परिवर्तन आघाडी समवेत विधानसभा निवडणुकीला सामोरे जाणार आहे. या नव्या पक्षाची नोंदणी करण्याचे काम महिनाभरात करण्यात येणार आहे. यासाठीची १५ सदस्यांची कार्य समिती गठीत झाली आहे. येत्या ५ सप्टेंबर रोजी नांदेडमध्ये एमआरएस पक्षाचे अधिवेशन होणार आहे. या अधिवेशनाला ५० हजारांपेक्षा जास्त कार्यकर्ते उपस्थित राहतील. एमआरएस हा पक्ष आगामी निवडणुकीनंतर सत्तेच्या केंद्रस्थानी राहील, अशी आशाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# सरसम येथील बोगस डॉक्टरांचे पोलीसांपुढे आव्हान

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,२० ऑगस्ट -**

हिमायतनगर तालुक्यातील मोजे सरसम येथील आरोप डॉक्टर पोलिसांना सापडता सापडेना अशा प्रतिक्रीया सरसम भागातुन येत आहेत.

मोजे सरसम येथील गेल्या अनेक दिवसांपासून या भागात एक बोगस डॉक्टर महिलाचे गर्भपात अवैधरित्या करीत होता. याच भागातील एका खबराने फोन मार्फत वैद्यकीय अधिकारी यांना घडत असलेल्या अवैधरित्या गर्भपात संदर्भात माहिती दिली.

प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर नखाते यांनी आपल्या पथकासह दि. १३ आगस्ट रोजी नवी अबाधि परीसरात एका घरात जाऊन पाहणी केली असता त्या ठिकाणी आरोपी बोगस डॉक्टर सह दोन माहिला अवैधरित्या गर्भपात करीत असल्याची तयारी सुरू होती. अंधाराचा फायदा घेऊन तेथील बोगस डॉक्टर व महिलाने पोबारा केला यावेळी या ठिकाणी पाहणी केली असता होमिओपॅथिक चे आयडेंटी कार्ड व पेनकिलर, अँटिबायोटिक, गर्भपात करण्याची किट,भुल देण्याचे इंजेक्शन यासह विविध प्रकारचे साहित्य जप्त करण्यात आले.या घटनेस आठ दिवसांचा कालावधी लोटला असून आज पर्यंत आरोपी सापडला नाही. म्हणून पोलीस प्रशासनाच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. आरोप,बोगस डॉक्टर एक प्रकारे पोलिसांपुढे आव्हान आसल्याच्या प्रतिक्रिया सरसम सह तालुक्यातुन होत आहेत. या गंभीर बाबीकडे पोलीस अधीक्षक यांनी लक्ष द्यावे असे बोलले जात आहे.

## प्रा.हाके यांचा नागनाथ घीसेवाड यांच्या संपर्क कार्यालयात सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,२० ऑगस्ट -**

ओबीसी आरक्षण बचाव चळवळीचे योद्धे प्रा.लक्ष्मण हाके यांचा बहुजन ओबीसी नेते नागनाथ घिसेवाड यांच्या संपर्क कार्यालयात सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

भोकर येथे १८ ऑगस्ट रोजी ओबीसी आरक्षण बचाव मेळाव्यास प्रा.लक्ष्मण हाके हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते,सभेनंतर भोकर विधानसभा मतदारसंघाचे बहुजन ओबीसी नेते नागनाथ घिसेवाड यांच्या संपर्क कार्यालयात प्रा.लक्ष्मण हाके यांचा पुष्पहार शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी नागनाथराव घीसेवाड, नामदेवराव आयलवाड, ओबीसी नेते नागोराव शेंडगे, बि.आर.पांचाळ, सुभाष नाईक, ज्येष्ठ पत्रकार एल.ए.हिरे, बालाजी राठोड, ॲड. परमेश्वर पांचाळ, दत्ता बोईनवाड, गितेश बोटलेवाड, प्रकाश बोंदीरवाड माधव सलगरे, गणेश आरलवाड ,गोविंद गिरी यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# बांग्लादेशातील हिन्दूवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ भोकर बंद यशस्वी

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,२० ऑगस्ट -**

मागील अनेक दिवसापासून बांग्लादेशात हिन्दू लोकांवर धार्मीक अत्याचार होत असून हिंसाचाराच्या अनेक घटना घडल्या आहेत. तसेच श्रध्दास्थानांची तोडफोड देवदेवतांचा अपमान केला जात आहे. तेथील धार्मीक कट्टरता वाद्याकडून महिलांवर अत्याचार केला जात आहे. त्यामूळे भारतातील हिन्दूच्या भावना दूखावल्या जात असून कट्टरतावाद्याकडून अत्याचाराचा कळस गाठला आहे मृतांची प्रेते भररस्त्यात लटकवली जात आहेत सदरिल घटना मानवतेला काळीमा फासणारी असून त्या निषेधार्थ भोकर सकल हिन्दू समाजाच्या वतीने दि.२० रोजी भोकर बंद चे आवाहन करण्यात आले होते.येथील व्यापाऱ्यांनी बंदला उत्फूर्त पाठिंबा देत आपली प्रतिष्ठाणे बंद ठेवून शंभर टक्के बंद यशस्वी केला.

दरम्यान मूस्लीम बांधवानी देखील आपली दूकाने बंद ठेवली बंद च्या काळात बाहेरगावहून येणाऱ्या प्रवाशांचे हाल झाले असून त्यांना पिण्याचे पाणी देखील मिळाले नाही शहरात अनूचित प्रकार घडू नये म्हणून जागोजागी पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते.सकल हिन्दू समाज भोकरच्या वतीने तहसीलदार यांचे मार्फत भारताचे राष्ट्रपती यांना पाठविण्यात आलेल्या नेवदनाद्वारे घटनेचा तिवृ निषेध करण्यात आला निवेदनावर पंजाब हूलगूंडे, आकाश गेंटेवार, विष्णू पांचाळ, साईदास माळवतकर, प्रकाश मूदिराज, संजय सोनाळे, शिवदास चिंताकूटे, पवन चक्रावार, राजू कानडे, शिवानंद पिलवंतसह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त



### बिलोली पोलिसांची मोठी कारवाई ; बेकायदा गुटखा विक्री प्रकरणी एकाला अटक

**बिलोली-** येथे बेकायदा गुटखा विक्री करणाऱ्या एका व्यक्तीला बिलोली पोलिसांनी सापळा रचून ताब्यात घेतले. त्यांच्याकडुन तब्बल एक लाख अडतीस हजार नऊसे नव्वद रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही माहिती बिलोली पोलीस चौकीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी दिली.अब्दुल नसीर अब्दुल रज्जाक (वय ५०) रा.छोटी गल्ली बिलोली ता.बिलोली जि.नांदेड असे या बेकायदा गुटखा विक्रेत्याचे नाव आहे. बिलोली जुना बसस्थानक कुंडलवाडीरोड येथे पानपट्टीवर बेकायदा गुटखा विक्री होत असल्याची गुप्त माहिती बातमीदारांकडून बिलोली पोलिसांना मिळाली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,बिलोली पोलीस चौकीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दिलीप मुंडे, पोलीस शिपाई व्यंकट घोंगडे,माधव जळकोटे,मारोती मुद्देमवार,सोळंके,विद्यमवार,होम गार्ड भालेराव आदींनी कारवाई केली. दि.१८ ऑगस्ट रोजी सकाळी ११:१५ वाजताच्या सुमारास बिलोली कुंडलवाडी रोडवर असलेल्या नासीर पान शॉप या पानपट्टीवर एक इसम आपल्या ताब्यात विनापरवाना बेकायदेशीररित्या प्रतिबंधीत केलेला गुटखा बाळगून त्याची चोरटी विक्री करित असताना एका संशयित व्यक्तीला ताब्यात घेतले असता त्याने गुटख्याचे गोण्या त्याच्या घराच्या शेजारी ओसरीमध्ये ठेवलेल्या आहेत. अशी माहिती दिल्याने छापा मारला असता सदर ठिकाणी पांढऱ्या गोण्या सापडली.मानवी जीवितास अपायकारक असलेल्या आणि महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेल्या बेकायदा गुटख्याच्या पुढ्या मिळून आल्या. या पुड्यांमध्ये २४७५०/ रूपये किमतींचे सागर पान मसाला असे नाव असलेल्या ०३ पांढऱ्या रंगाची पोते ज्यात एका पोत्यामध्ये ५० पाकीटे आहेत,प्रमियम राज निवास सुगंधीत पान मसाला ६१४४०/ रूपये १० पांढऱ्या रंगाची पोते ज्यात एका पोत्यात ३२ पाकीटे,प्रमियम जेड.एल.०१ जाफरानी जर्दा १२ पोती पांढऱ्या रंगाची पोते ज्यात एका पोत्यात ५० एस.आर.सुंगधीत तम्बाकू असा १,३८९९०/ रूपये एकूण एक लाख अडतीस हजार नऊसे नव्वद रूपये मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. पोलीस उपनिरिक्षक दिलीप भानुदास मुंडे यांनी बिलोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने अन्नसुरक्षा अधिनियम कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करून आरोपीस ताब्यात घेतले.

### लीड ग्रुप महाराष्ट्रातील शाळांचा कायापालट करत आहे : सुमीत मेहता

**नांदेड-**लीड ग्रुप, भारतातील सर्वात मोठा आणि सर्वात वेगाने वाढणारा स्कूल एडटेक, शैक्षणिक परिणाम सुधारत आहे आणि संपूर्ण महाराष्ट्रातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचा अभ्यासक्रम, मल्टी-मॉडल अध्यापन-शिक्षण पद्धती आणि एआय-चालित उपायांसह, लीड ग्रुप्सची एलाइन्ड इंटिग्रेटेड स्कूल सिस्टम विद्यार्थ्यांना विषयांची सखोल वैचारिक समज प्राप्त करू शकते याची खात्री देते. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतील जवळपास ३०० शाळांनी आधीच डएऊ ची इंटिग्रेटेड स्कूल एडटेक प्रणाली लागू केली आहे. शिवाय, महाराष्ट्रातील शाळांमधील ३२०० हून अधिक शिक्षकांना लीड ग्रुपने आधीच प्रशिक्षित आणि प्रमाणित केले आहे. पुढील काही वर्षांमध्ये लीड ग्रुपचे संपूर्ण महाराष्ट्रातील ८०० शाळांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट असल्याची माहीती लीड ग्रुपचे सीईओ आणि सह-संस्थापक सुमीत मेहता यांनी दिली.एक मूल दररोज शाळेत ६ ते ७ तास घालवते. तरीही या विद्यार्थ्यांपैकी फक्त काही अंश - जे महानगरीय भागात उच्च फीच्या शाळांमध्ये शिकत आहेत - आंतरराष्ट्रीय स्तरावरील बेंचमार्क, बहु-मॉडल शिक्षणाचा आनंद घेतात. लीड ग्रुपमध्ये, स्थान काहीही असो, आम्ही आमच्या एकात्मिक स्कूल एडटेक प्रणालीसह संपूर्ण महाराष्ट्रातील शाळांना सक्षम बनवून हे बदलण्यासाठी वचनबद्ध आहोत, प्रत्येक शाळेला मोठ्या शहरांमध्ये त्यांच्या समवयस्कांच्या बरोबरीने शैक्षणिक उत्कृष्टता प्राप्त करण्यात मदत करून महाराष्ट्रातील शाळांना सक्षम बनवू.लीड ग्रुप शाळेच्या प्रशासकांसाठी शैक्षणिक उत्कृष्टता आणि ऑपरेशनल कार्यक्षमता सक्षम करते; शिक्षक कौशल्ये आणि उत्पादकता वाढवते आणि पालकांना चांगल्या प्रकारे गुंतवण्यास मदत करते. हे महाराष्ट्रातील शाळांसमोरील काही सर्वात मोठी आव्हाने सोडवत आहे, ज्यात विद्यार्थ्यांचे इंग्रजीतील प्राविण्य समाविष्ट आहे; विषयांची कमकुवत वैचारिक समज; शैक्षणिक कॅलेंडर नियोजन; वर्गात शिक्षकांची प्रभावीता; आणि विषय-विशिष्ट अध्यापनशास्त्र. महाराष्ट्रातील लीड ग्रुप भागीदार शाळा सुधारित शैक्षणिक परिणाम आणि पालकांमधील अधिक अनुकूलतेचा लाभ मिळवण्यात सक्षम असल्याचे लीड ग्रुपचे सीईओ आणि सह-संस्थापक सुमीत मेहता म्हणाले.

## छावा संघटनेच्या वतीने मराठा भगिनींचा साडीचोळी देवुन सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,२० ऑगस्ट -**

छावा संघटनेने सामाजिक कार्य करताना मराठा आरक्षण व कर्जबाजारीपणा यामुळे आत्महत्या केलेल्या बांधवांच्या घरी जावून भगिनींना साडीचोळी व पाल्यांना शालेय साहित्य भेट देत राखीपौर्णिमा साजरी केली.

गेल्या काही महिन्यात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी तालुक्यातील काही तरुणांनी आपला जीव दिला.तसेच नापिकी व कर्जबाजारीपणा यामुळे काही शेतकरी बांधवानी मृत्यूला कवटाळले. रक्षाबंधन सणानिमित्त त्यांची आठवण ठेवत छावा संघटनेच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

नायगांव तालुक्यातील भोपाळा, टाकळी, केदारवडगाव, बळेगाव, गडगा यासह तेरा गावातील आत्महत्या ग्रस्त पिडीत कुटुंबाच्या घरी जावून भगिनींना मायेची साडीचोळी, मिठाई सुपूर्द करण्यात आली.कुटुंबातील पाल्यांना



शालेय साहित्य देण्यात आले.जिव्हाळयाने घरी आलेल्या सर्वाना भगिनींनी राखी बांधून औक्षण केले.सणासुदीला आवर्जून आठवण ठेवून छावाच्या भावांनी साजरा केलेल्या रक्षाबंधनाने पिडीत कुटुंबाना उभारी मिळाली.यावेळी छावाचे जिल्हाध्यक्ष माधवराव ताटे, तालुकाध्यक्ष प्रताप कदम, राष्ट्रीय मराठा महासंघ जिल्हाध्यक्ष चंद्रकांत पवार, आनंदराव बावणे, संभाजी ब्रिगेडचे बालाजी देशमुख, साई पाटील, शेषेराव बेलकर, सुदर्शन गाढे, केशव हंबर्डे, शहाजी जाधव, साईनाथ कदम, बालाजी कुदळे, सोपान पाटील आदि उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना पीक विम्याचे अनुदान द्या

## आमदार मोहनराव हंबर्डे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,२० ऑगस्ट -**



कापुस आणि सोयाबिन पिकासाठी सन २०२३ च्या खरीप हंगामातील मिळणारा पीक विमा अनुदान नांदेड दक्षिण मतदार संघातील वंचित लाभार्थी शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे अशी मागणी नांदेड दक्षिणचे आमदार मोहनराव हंबर्डे यांनी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे अशी मागणी नांदेड दक्षिणचे आमदार मोहनराव हंबर्डे यांनी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

आ. हंबर्डे यांनी या निवेदनात नमूद केले आहे की राज्य शासनाकडून सन २०२३ च्या खरीप हंगामातील सोयाबिन आणि कापुस पिक घेणा-या शेतक-यांना हेक्टरी ५००० रुपये अनुदान देण्यात येत आहे. यासाठी कृषी सहाय्यकांमार्फत संबंधित पिकांचा पिक पेरा असलेल्या शेतक- यांच्या याद्या प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. परंतु माझ्या मतदार संघातील अनेक गावांमध्ये ज्या शेतक- यांनी मागील सन २०२३ च्या खरीप हंगामातील पीक सोयाबिन व कापुस हे पिक घेतले होते. काही तांत्रिक अडचणीमुळे शेतक-यांना ई-पिक पाहाणी करण्यात व्यत्यय आला असल्यामुळे त्यांची लाभार्थी यादीमध्ये नावे आली नाहीत. विशेष म्हणजे सर्व शेतकऱ्यांनी पिक विमा कंपनीकडे पिकांचा विमा भरलेला आहे, त्यांच्या सातबारावर सुध्दा कापुस आणि सोयाबिन हा पेरा आहे. असे अनेक लाभार्थी शेतकरी २०२३ च्या खरीप हंगामातील लाभार्थी यादीमध्ये नाव नसल्याने सदरील लाभापासून वंचित राहत आहेत. तरी सर्व लाभार्थी शेतक-यांना लाभ मिळवुन देण्यासाठी शासकीय स्तरावरुन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. आमदार मोहनराव हंबर्डे यांनी या निवेदनात केली आहे.

# ओवाळणीतून मिळालेल्या रक्कमेतुन जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

**तभा वृत्तसेवा**
**देगलुर,२० ऑगस्ट -**

रक्षाबंधन निमित्त तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी येथे बालिका पंचायत राज समितीच्या वतीने रक्षाबंधनाचा सार्वजनिक कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून देगलूर पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षक विश्वनाथ झुंझारे हे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सरपंच संतोष पाटील यांची उपस्थिती होती.

गावातील मारोती मंदिराजवळ बालिका पंचायत द्वारा आयोजित सार्वजनिक रक्षाबंधन कार्यक्रमात गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक विश्वनाथ झुंजारे यांनी बालिका पंचायत राज चे कौतुक करत गावातील विकास कामांची प्रशंसा केली. बालिका पंचायत राज कडून घेतलेल्या दारू बंदी,हुंडा बंदी आदी महत्वाच्या निर्णयावर बोलताना म्हणाले की गावात या विरोधात



कोणी वागत असेल ,कोणी दारू पित असेल किंवा विकत असेल तर त्याची गय न करता त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल. दारूबंदी , गुटखा बंदी चा निर्णय अतिशय स्तुत्य असून यावर होणारा खर्च आपल्या परिवाराच्या प्रगती साठी वापरावा असे ते म्हणाले.

### रक्षाबंधन निमित्त येरगी बालिका पंचायतचा आगळा वेगळा उपक्रम

बालिका पंचायत राज समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थितांना राख्या बांधून त्यांचे औक्षण केले. प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक विश्वनाथ झुंजारे,सरपंच संतोष पाटील,ग्राम विकास अधिकारी राजेश तोटावाड, मुख्याध्यापक प्र.ईश्वर वाडीकर, तंटामुक्त अध्यक्ष, सर्व शिक्षक, बालिका पंचायत राज समितीचे सरपंच अंजली वाघमारे, उपसरपंच पुनम सुर्यवंशी, ग्रामसेवक महादेव दाणेवार, ग्रामपंचायत सदस्य शिवकांता भुरळे, रोहिणी दाणेवार, सपना काळीगवार, महादेव गादगे, महादेव गोशट्टी, श्रीदेवी धाकपाडे, रूद्राणी चैडके, आश्विनी पांचाळ, तंटामुक्त अध्यक्ष शिवाणी मठपती, पोलिस पाटील अनिता बागेवार, आजी माजी सर्व पदाधिकारी कार्यक्रमास उपस्थित असलेल्या प्रत्येकाने आपापल्या परीने ओवाळणी दिली. यातून तब्बल २२ हजार ४०० रुपये जमले आहेत. बालिका पंचायत या २२ हजार ४०० रुपयांचे शैक्षणिक साहित्य घेऊन गावातील शाळेला देणार आहे. यामुळे गावातील विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग होईल. रक्षाबंधन निमित्त बालिका पंचायत राज समितीच्या वतीने आयोजित सार्वजनिक रक्षाबंधन कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# भारत बंदला विरोध

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,२० ऑगस्ट -**

अनु जाती जमातीच्या आरक्षणात उपवर्गिकरण करण्यात यावे असा सर्वोच न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत व भारत बंदला विरोध म्हणून नायगाव तहसिलदार यांना विविध सामाजिक संघटनेच्या वतीने दि. २० ऑगष्ट रोजी निवेदन देण्यात आले आहे.

१ ऑगष्ट, २०२४ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने अनु जाती व जमातीच्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याचा निर्णय सात न्यायधिशाच्या खंडपीठाने निर्णय घेतलेला आहे या निर्णयामुळे अनु जाती व जमातीतील लाभ वंचित घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये शैक्षणिक, नोकरीमध्ये न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असुन या निर्णयामुळे डॉ.बाबासाहेब यांना अपेक्षित असलेल्या सामाजिक न्याचे वाटप समान होणार असल्याने या निर्णयाचे अनुसूचित जाती व जमातीतील लाभवंचित घटाकतुन सर्वत्र स्वागत होत असताना . काही सामाजिक आणि राजकीय संघटनांनी या निर्णयाविरोधात २१ ऑगष्ट रोजी भारत बंदचे आवाहन केले आहे. या बंदला आमचा विरोध म्हणून नायगांव तहसीलदार यांना २० ऑगस्ट रोजी विविध समाजातील वेगवेगळ्या सामाजिक संघटनेच्था वतीने निवेदन देण्यात आले.

यावेळी एबीएसचे जिल्हाध्यक्ष पंडीत वाघमारे, मासचे राजेंद्र रेड्डी, संपादक प्रकाश हाणमंते, लोकस्वराज्यचे डी. के. पवार, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कांबळे, ॲड. अविनाश निलंगेकर, शेषेराव रोडे, प्रा डॉ. शंकर गड्डमवार, रा. ना. मेटकर, जे पी. वाघमारे, शाहीर माधव बैलकवाड, इंजि शंकर माळगे, आकाश कांबळे, भागवत कांबळे, राधाकृष्ण झुंजारे, प्रा. बालाजी गायकवाड, भाऊराव बोयाळ, भीमराव बैलकवाड, किशन वाघमारे गजानन वाघमारे, मारोती डोईवाड, एन एस वाघमारे, दिंगाबर झुंजारे, माणिका वाघमारे, प्रकाश पवार, निवृती सुर्यवंशी आदीच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# आरक्षण उठलेल्या जमिनीची गुंठेवारी व एन.ए. लेआऊट प्रक्रिया सुरू करा

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,२० ऑगस्ट -**

राज्य शासनाने नांदेड शहरातील अनेक एकर जमिनीवरील आरक्षण उठवले असताना देखील महानगरपालिका मात्र जमीन व प्लॉट धारकांना अद्याप जमिनीची गुंठेवारी व एन.ए. लेआऊट प्रक्रिया करून देत नाही. तसेच गेल्या अनेक महिन्यांपासून नियमित सुरू असणारी गुंठेवारी देखील बंद आहे. या तिन्ही बाबी तात्काळ सुरू करण्यात याव्यात अशा मागणीचे निवेदन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष मोहसीन खान पठाण यांच्या नेत्वाखालील शिष्टमंडळाने अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांना दिले आहे.

आरक्षण उठलेल्या जमीन व प्लॉट मालकां मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. पण येथील महानगरपालिका प्रशासन मात्र आरक्षण उठलेल्या जमिनीची गुंठेवारी व एन.ए. लेआऊट प्रक्रिया करत नाही. यामुळे अनेकांना आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. बऱ्याच जणांनी आपले प्लॉट विक्रीस काढले आहेत, पण ते घेण्यासाठी कोणीही धजावत नाही. त्यामुळे त्यांचे नियोजन कोलमडत असून याचा फटका कुटुंबातील व्यक्तींना देखील बसत आहे.

नागरिकांसोबतच अनेकजण प्लॉटिंगचा व्यवसाय करतात ते देखील अडचणीत सापडले आहेत. त्याबरोबरच हजारो ब्रोकरवर ही सध्या उपासमारीची वेळ आली आहे. घरातील कारभार चालवणे देखील त्यांना अवघड झाले आहे. काही जणांची मुले उच्च शिक्षण घेत होती. त्यांना आपले अर्धवट शिक्षण देखील सोडावे लागले आहे. तसेच काही जणांना आपल्या मुलीचा विवाह करायचा होता, तो देखील त्यांना थांबवावा लागला आहे. यामुळे असे भूखंड मालक आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलण्याच्या तयारीत आहेत. महानगरपालिकेने तात्काळ आरक्षण उठलेल्या जमिनीची गुंठेवारी व एन.ए. लेआउुट प्रक्रिया सुरू करावी तसेच नियमित गुंठेवारी देखील सुरू करावी अशा मागणीचे निवेदन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हा अध्यक्ष मोहसीन खान पठाण यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मंगळवार दि. २० रोजी अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांना दिले. यावेळी त्यांच्यासोबत राष्ट्रवादी युवकचे कार्याध्यक्ष माधव पाटील चिंचाळे, उपाध्यक्ष अफसर पठाण, आयुब खान, अब्दुल आतिक, असलम पटेल, शेख इमरान, ऐजाज मिर्झा बेग, सय्यद मुन्वर, शेख आवेश, मोहम्मद दानिश, तसेच राष्ट्रवादीचे ज्येष्ठ कार्यकर्ते सय्यद अहेमद यांच्यासह आदीजन उपस्थित होते.



**गुंठेवारी व एन.ए. लेआऊट सुरु होईलः गिरीश कदम**

आम्ही राज्य शासनाकडे महानगरपालिकेच्या वतीने याबाबत प्रस्ताव पाठवला असून पत्र व्यवहार देखील सुरू आहे. लवकरात लवकर आरक्षण उठलेल्या जमिनीचे व प्लॉटची गुंठेवारी व एन.ए. लेआऊट सुरू होईल असे आश्वासन यावेळी अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांनी शिष्टमंडळाला दिले.